पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २७५ ■ मंगळवार, दि.१४ एप्रिल २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com




# मुख्यमंत्री सहाय्यता निधीची नवीन ऑनलाईन प्रणाली सुरू

प्रतिनिधी १४ एप्रिल

**मुंबई:** राज्यातील गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना उपचारासाठी आर्थिक सहाय्य अधिक वेगात मिळणार आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची अद्यावत ऑनलाईन प्रणाली सुरू होणार आहे. या प्रणालीमुळे अर्ज मंजुरीची प्रक्रिया कार्यालयीन ८ तासांत पूर्ण होणार आहे. विशेष म्हणजे आता रुग्णाऐवजी थेट कक्षाशी संलग्न असणाऱ्या रुग्णालयामार्फत अर्ज सादर होणार आहेत. त्यामुळे रुग्णाला कोणत्याही प्रकारचा अर्ज भरावा लागणार नाही. त्यामुळे उपचार प्रक्रियेला गती मिळणार आहे. या प्रणालीचे येत्या काही दिवसातच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उदघाटन करण्यात येणार आहे अशी माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षा कडून देण्यात आली आहे.

गेल्या काही वर्षभरापासून मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत

## 8 तासात अर्जाला मंजुरी

कक्षामध्ये नावीन्य पूर्ण रुग्णस्नेही बदल करण्याचे काम सुरु आहे. त्याचाच एक भाग मुख्यमंत्री सहाय्यता निधीची नवी ऑनलाईन प्रणाली असणार आहे. रुग्णाने रुग्णालयात सर्व रीतसर कागदपत्रे दिल्यानंतर रुग्णालय प्रशासन त्याचा अर्ज मुख्यमंत्री सहायता निधी कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठविणार आहे. त्या ठिकाणी नियमानुसार सर्व कागदपत्रे असल्यास अर्ज मंजुरीची प्रक्रिया कार्यालयीन ८ तासांत पूर्ण होणार आहे. यामुळे रुग्ण आणि त्याच्या नातेवाईकाला मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच, गेल्या आर्थिक वर्षात १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्षप्रमुख रामेश्वर नाईक म्हणाले की, रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, यासाठी ही ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात येत आहे. यामुळे आता अर्ज मंजुरीची प्रक्रिया जलद होऊन रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या नवीन प्रणालीचे अधिकृत उद्घाटन लवकरच होणार असून, त्यानंतर राज्यभरात ती प्रभावीपणे राबवण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी गरजू रूग्णांनी १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.







# ईडीने 'आयपॅक'च्या प्रमुखालाच अटक!

**नवी दिल्ली :** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी शिगेला पोहचली असताना या निवडणुकीच्या तोंडावर राजकीय वर्तुळातून एक मोठी बातमी समोर आली आहे. पश्चिम बंगालच्या कुप्रसिद्ध कोळसा घोटाळ्याशी संबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरणात अंमलबजावणी संचालनालय अर्थात ईडीने मोठी कारवाई केली आहे.










## पीसीएम-पीसीबी सीईटीच्या दुसऱ्या संधीसाठी मुदतवाढ

**मुंबई :** राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व कृषी शिक्षण या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या एमएचटी सीईटी परीक्षेच्या दुसऱ्या संधीसाठी नोंदणीला विशेष मुदतवाढ देण्यात आली आहे. आता विद्यार्थ्यांना विलंब शुल्कासह १५ आणि १६ एप्रिलला नोंदणी करता येईल.

सध्या पहिल्या संधीची पीसीएम समूहाची सीईटी परीक्षा सुरू आहे. तर, पीसीबी समूहाची सीईटी परीक्षा २१ एप्रिलपासून सुरू होत आहे. दुसऱ्या संधीसाठी तत्काळ नोंदणीचे आवाहन केले आहे. ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी नोंदणी केली नाही, ते दुसऱ्या संधीसाठी नोंदणी करू शकतात.






१४ एप्रिल हा दिवस भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील प्रेरणादायी पर्व आहे. या दिवशी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती देशभर मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. महाराष्ट्र शासन तसेच देशातील विविध संस्थांकडून त्यांच्या कार्याचा गौरव करणारे विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. 'विश्वरत्न', 'भारतरत्न', 'घटनाकार' आणि 'भारत भाग्यविधाता' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बाबासाहेबांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून विविधतेने नटलेल्या भारताला एकसंघ राष्ट्र म्हणून बांधून ठेवण्याचे ऐतिहासिक कार्य केले.त्यामुळेच त्यांच्या जयंती दिनी संपूर्ण देशात त्यांना आदरांजली व्यक्त केली जाते. काश्मीर पासून कन्याकुमारी पर्यंतची जनता आजच्या दिवशी महामानवापुढे नतमस्तक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेले संविधान व त्यावर आधारित लोकशाही जोपर्यंत भारतात आहे, एकसंघ भारतासाठी कायद्याची पोलादी चौकट कायम आहे.त्यांना आदरांजली व्यक्त करताना संविधानाच्या स्वरुपात बाबासाहेबांनी दिलेल्या समानतेच्या, न्यायाच्या आणि बंधुतेच्या धाग्यात सर्व भारतीयांना गुंफण्याचा संकल्प करणे आवश्यक आहे.

# बाबासाहेबांचे संविधान म्हणजे...एकसंघ भारताची पोलादी चौकट

**राष्ट्र प्रथम – बाबासाहेबांचा दृष्टिकोन**

बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका स्पष्ट होती. संविधान सभेत बोलताना ते म्हणाले होते, 'राष्ट्र प्रथम, समाज नंतर आणि व्यक्ती त्यानंतर.' स्वतः आयुष्यभर सामाजिक अन्याय सहन करूनही त्यांनी कधीही कोणाबद्दल सूडाची भावना बाळगली नाही. उलट, त्यांनी अशी राज्यघटना निर्माण केली ज्यामध्ये प्रत्येक नागरिकाला समान न्याय मिळेल. आचार्य प्र. के. अत्रे यांनी बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर लिहिलेल्या आपल्या आदरांजलीत आंबेडकरांना 'जुलूमाविरुद्ध उगारलेली वज्राची मुठ' असे संबोधले आहे. ही उपमा त्यांच्या संघर्षशील वृत्तीचे आणि अन्यायाविरुद्धच्या लढ्याचे अचूक चित्रण करते.

**भारताच्या अखंडतेची शाश्वती**

स्वातंत्र्यानंतर भारत एकसंघ राहील का याबाबत अनेक पाश्चिमात्य नेत्यांना शंका होती. विविध धर्म, भाषा, जाती यामुळे भारताचे विभाजन होईल, असे भाकीत केले जात होते. विस्टन चर्चिल यांसारख्या नेत्यांनी भारताच्या एकात्मतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते.जगातील अनेक नेत्यांनी हा खंडप्राय देश एकत्र राहणार नाही,असे भाकीत केले होते.पाकिस्तानच्या फाळणीनंतर पश्चिम आशिया खंडात धर्माच्या नावावर झालेली अमानुष मानवी कत्तल जगाच्या पुढे होती. भारतातील विविधता, विविध धर्मांचे लोक,धर्मावरून झालेली विभागणी हे मोठे उदाहरण पुढे होते. त्यामुळे भारताचे भविष्य अंधकारमय वाटणे तत्कालीन परिस्थितीला धरून होते.मात्र बाबासाहेबांनी अभ्यासाअंती यावर रामबाण उपाय शोधून काढला. ते म्हणजे संविधान, आपली राज्यघटना. संविधान सभेपुढील भाषणात ते म्हणाले होते,स्वातंत्र्य आणि समानता ही मूल्ये बंधूतेशिवाय टिकू शकत नाही.राजकीय लोकशाही यशस्वी तेव्हाच होईल जेव्हा सामाजिक लोकशाही अस्तित्वात असेल.त्यामुळे आजचा दिवस सामाजिक लोकशाही बळकट करण्याचा देखील आहे.भारतीय संविधान सामाजिक आर्थिक, राजकीय,समानता देण्याच्या दृष्टीने अतिशय श्रेष्ठ दर्जाचे दस्तावैज आहे.

**संविधानातील कलम; एकात्मतेचा कणा**

आपण बघतो, भाषा, प्रांत,जाती,अस्मिता यावरून देशात आजही अनेक आंदोलने सुरू असतात, विविध संघटना आणि राजकीय पक्ष आपापल्या भूमिका मांडत असतात.संविधानाचे वैशिष्ट्य म्हणजे संविधान भाषा,प्रांत,जाती,अस्मिता यांचे अस्तित्व मान्य करते.मात्र सोबतच राष्ट्रापुढे सर्व बाबी गौण ठरवते. विधिमंडळ, कार्यपालिका, न्यायपालिका,माध्यमे अशा सर्व स्तंभांना त्यांनी परस्पर पूरक उभे केले आहे.त्यामुळे भारतीय राज्यघटनेला पुढे ठेवूनच सर्व घटकांना आपली वाटचाल करावी लागते.'भारतीय संसद, न्यायपालिका आणि कार्यपालिका या एकमेकांवर नियंत्रण व संतुलन (checks and balances) ठेवतात. कार्यपालिका राज्यघटनेनुसार प्रशासन करते, आणि या सर्वांवर माध्यमे व जनतेचे लक्ष राहते. जबाबदारीची,कार्यवाहनाची,जाणिवांची आणि दायित्वाची अशी मजबूत पोलादी साखळी घटनेच्या माध्यमातून निर्माण झाली आहे.त्यासाठी महत्त्वपूर्ण ठरले आहेत भारतीय राज्यघटनेतील मूलभूत अधिकार. या मूलभूत अधिकारांनी स्पष्ट बजावले आहे की या मूलभूत अधिकारांनी स्पष्ट केले, 'हा देश हा अस्मितेवर नव्हे,भावनेवर नव्हे तर सर्वसंमतीवर चालेल.'

शोषित,वंचित,गरीब मागास सर्व घटकांना समतोल विकासाची संधी मिळणे व त्यांच्या न्याय्य हक्काचे रक्षण होणे किती आवश्यक आहे हे बाबासाहेबांना माहिती होते. त्यामुळेच त्यांनी घटनेमध्ये मूलभूत अधिकार सुस्पष्टपणे अंतर्भूत केले.या अधिकारामुळे कायद्यापुढे सर्व समान आणि सर्वांना कायद्याचे संरक्षण मिळाले आहे.

**समानतेचा अधिकार (कलम १४ ते १८)**

बाबासाहेब आंबेडकरांनी मूलभूत अधिकारांमध्ये १४ ते १८ या कलमांमध्ये सर्व नागरिक कायद्यापुढे समान असतील, जात, धर्म, वंश,लिंग किंवा जन्मस्थानावरून भेदभावास मनाई,अस्पृश्यता



अमान्य,आणि नियुक्तीची समान संधी,तसेच देशाप्रतीची बांधीलकी या बाबी नमूद केल्या. एका सामान्य स्त्री-पुरुषाला देशाचा प्रधानमंत्री, राष्ट्रपती बनण्याचा अधिकार देतानाच भेदभावाला त्यांनी या समानतेच्या अधिकाराने कायदेशीर बंधन घातले आहे.

**स्वातंत्र्याचा अधिकार (कलम १९ ते २२)**

ज्यांना हजारो वर्ष शिक्षण, वाणी, अधिकार आणि सहभागांपासून जाती धर्माच्या आधारावर संधी नाकारली गेली. त्या सर्वांना स्वतंत्र भारतात अभिव्यक्ती स्वातंत्र्य देण्याचे कार्य बाबासाहेबांमुळे झाले. राज्यघटनेतील कलम १९ प्रत्येक भारतीयाला भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार देते.भारताचा नागरिक कोणत्याही राज्यामध्ये मुक्त संचार करू शकतो. भारताच्या कोणत्याही भागात राहण्याचा व स्थायिक होण्याचा अधिकार त्याला मिळालेला आहे.जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्याचे संरक्षण,शिक्षणाचा हक्क, न्यायालयात दाद मागण्याचा हक्क, विनाकारण स्थानबद्ध न करण्याचा हक्क अशा अनेक मूलभूत हक्कांची तरतूद करण्यात आली आहे.

**शोषणाविरुद्ध संरक्षण (कलम २३ - २४)**

हजारो वर्षाची वेठबिगारी, सालदारी, बिनपगारी शोषणाला बळी पडलेल्या शोषितांना थेट घटनेच्या माध्यमातूनच बाबासाहेबांनी न्याय दिला. भारतीय राज्यघटनेच्या कलम २३ आणि २४ मध्ये शोषणाविरुद्ध संरक्षण दिले आहे.या कायद्यामुळे स्वतंत्र भारताच्या स्वातंत्र्योत्तर काळात माणसांना गुलाम ठेवणे, वेठबिगारी सारखे काम करुन घेणे, बिनपगारी सालदारी करणे, सक्तीने सेवा करायला सांगणे, धर्म, वंश, जात यावरुन काम करुन घेणे, बळजबरीची मजुरी करुन घेणे, १४ वर्षाखालील कोणत्याही बालकाकडून काम करुन घेणे, अर्थात बालमजुरीवर बंदी घालण्यात आली.ही फार मोठी क्रांती होती आणि याचा कायदा बनल्यामुळे हजारो सालाच्या गुलामगिरीतून मागासवर्गीयांची, शोषितांची मुक्तता झाली.

**धर्मस्वातंत्र्य (कलम २५ ते २८)**

धार्मिक चालीरीती व रुढीपरंपरांच्या नावावर शतकानुशतके चाललेल्या शोषणाला घटना लागू झाल्यानंतर कायद्याच्या चौकटीने कायमचा पायबंद बसला. सोबतच सर्वांना आपापला धर्म पाळण्याची मुभा देण्यात आली. मात्र सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता आणि आरोग्याला घातक नसेल अशा वर्तनाची हमी कायद्याने घेण्यात आली. प्रत्येक धर्माला धार्मिक विधी, धार्मिक व्यवहाराची व्यवस्था, सांस्कृतिक शैक्षणिक हक्क प्रदान करण्यात आले.धार्मिक शिक्षण, धार्मिक उपासनेचे स्वातंत्र्य मिळाले. भारतातील विविध जातीधर्मांच्या लोकांना राज्यघटनेने हे स्वातंत्र्य सार्वजनिक सुव्यवस्थेच्या अधीन राहून पाळण्याचे अधिकार या कलमाने दिले. भारतीय समाजावर असणारा धर्माचा,धार्मिक चालीरीतींचा पगडा, याचा अभ्यास करून बाबासाहेबांनी मूलभूत हक्कांमध्ये हे स्वातंत्र्य बहाल केले आहे. यासोबतच त्यांनी कलम २९,३० अन्वये अल्पसंख्याकांना सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार आपली भाषा व संस्कृती जपण्याचा अधिकार दिला आहे. आणि सुरूवात महत्त्वाचे म्हणजे भारतातला कोणताही नागरिक त्याच्यावरील अन्यायासाठी कलम ३२ अन्वये हक्कांचे संरक्षण करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे.

**सर्वांसाठी न्याय – व्यापक दृष्टी**

बाबासाहेब स्वतः वंचित समाजातून आले होते, पण त्यांनी फक्त मागासवर्गीयांसाठी नव्हे तर सर्व समाजासाठी न्याय व्यवस्था उभी केली. अनुसूचित जाती-जमातींसाठी आरक्षण, समान संधी,सामाजिक न्यायासाठी कायदेशीर संरक्षण त्यांनी दिले. सोबतच कोणत्याही समाजावर अन्याय होणार नाही याची पूर्ण काळजी घेतली.

**घटना निर्मिती – राष्ट्रनिर्मितीचा पाया**

भारतीय राज्यघटना ही केवळ कायद्यांचा संच नाही, तर त्यात राष्ट्रनिर्मितीचा स्वयंस्पष्ट आराखडा आहे. बाबासाहेबांनी घटनेच्या माध्यमातून संघराज्य व्यवस्था मजबूत केली केंद्र आणि राज्य यांच्यात संतुलन ठेवले. न्यायव्यवस्थेला स्वातंत्र्य दिले.यामुळे भारत एक अखंड आणि सक्षम राष्ट्र बनला.

**संविधान टिकले तर लोकशाही टिकेल**

महामानवाला अभिवादन करताना प्रत्येक भारतीयाने ही शपथ घेणे गरजेचे आहे की, संविधान टिकले तर लोकशाही टिकेल. आणि राजकीय लोकशाही तेव्हाच टिकेल जेव्हा सामाजिक लोकशाही अस्तित्वात असेल. आपण संविधानाच्या अमृत महोत्सवी काळात आहोत.

या पार्श्वभूमीवर प्रत्येक भारतीयाने संविधान समजून घेणे आवश्यक आहे.संविधानाचे पालन करणे आवश्यक आहे.आपल्या अधिकारांसोबत भारताचा नागरिक म्हणून आपली कर्तव्येही ओळखणे आवश्यक आहे. बाबासाहेबांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून एकसंघ, न्याय्य आणि प्रगत भारत उभा केला. जगाला वाटत होते की भारत टिकणार नाही, पण आज भारत जगातील सर्वात मोठी लोकशाही आहे,जगातील महाशक्ती म्हणून उदयास येत आहे. हे त्यांच्या दूरदृष्टीचे फलित आहे. १४ एप्रिलच्या त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्यापुढे नतमस्तक होताना... चला भारतीय म्हणून आपण एकच संकल्प करुया...संविधानाचा सन्मान करुया, समानतेचे,बंधुत्वाचे मूल्य जपूया सर्वप्रथम एक भारतीय बनूया आणि एकसंघ भारत अधिक मजबूत करुया... हीच महामानव बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याला खरी आदरांजली ठरेल.

**प्रवीण टाके**
उपसंचालक (माहिती) विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर मो.९७०२८५८७७७

## व्यक्ती विशेष

### महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर



आज जयंती


बाबासाहेब डॉ. भीमराव आंबेडकर यांचा जन्म १४,एप्रिल १८९१ रोजी झाला, ते त्यांच्या पालकांचे १४ वे आणि शेवटचे अपत्य होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे सुभेदार रामजी मालोजी सकपाळ यांचे सुपुत्र होते. बाबासाहेबांचे वडील ब्रिटिश सैन्यात सुभेदार होते. ते संत कबीरांचे अनुयायी होते आणि सुशिक्षित होते. बाबासाहेबांचे प्राथमिक शिक्षण मुंबईत झाले. भारतात अस्पृश्य असणे काय असते याचा धक्कादायक अनुभव त्यांना शालेय जीवनात आला.

डॉ. आंबेडकर हे सातारा येथे शालेय शिक्षण घेत असतानाच त्यांच्या आईचे निधन झाल्याने आत्याने त्यांचे संगोपन केले. शालेय शिक्षणादरम्यान त्यांना अस्पृश्यतेचा अभिशाप सहन करावा लागला. १९०७ मध्ये मॅट्रिक झाल्यानंतर त्यांचा विवाह, बाजारातील एका खुल्या शेडमध्ये झाला. डॉ.आंबेडकरांनी एल्फिन्स्टन कॉलेज, बॉम्बे येथे पदवीचे शिक्षण पूर्ण केले, ज्यासाठी त्यांना बडोदा संस्थानचे सयाजीराव गायकवाड यांच्याकडून शिष्यवृत्ती मिळत होती. पदवी संपादन केल्यानंतर त्यांना करारानुसार बडोदा संस्थानमध्ये जावे लागले. बडोद्यात असताना त्यांच्या वडिलांचे निधन झाले. १९१३ या वर्षात डॉ. आंबेडकरांची उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला जाण्यासाठी विद्वान म्हणून निवड झाली , हा त्यांच्या शैक्षणिक कारकिर्दीचा निर्णायक टप्पा होता. त्यांनी कोलंबिया विद्यापीठातून १९१५ आणि १९१६ मध्ये अनुक्रमे एमए आणि पीएच.डी. पदवी प्राप्त केली. त्यानंतर पुढील शिक्षणासाठी ते लंडनला रवाना झाले . तेथे त्यांना ग्रेज इन फॉर लॉमध्ये प्रवेश देण्यात आला आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्समध्ये डी.एससीची तयारी करण्यासही परवानगी देण्यात आली. पण बडोद्याच्या दिवाणांनी त्यांना भारतात परत बोलावले. पुढे त्यांनी बार-अ‍ॅट -लॉ आणि डी.एस्सी. पदवी देखील मिळवली. त्यांनी जर्मनीतील बॉन विद्यापीठातही काही काळ शिक्षण घेतले. १९१६ मध्ये त्यांनी 'भारतातील जाती - त्यांची व्यवस्था , उत्पत्ती आणि विकास' हा शोध निबंध वाचला. १९१६ मध्ये त्यांनी 'भारताचा राष्ट्रीय लाभांश - एक ऐतिहासिक आणि विश्लेषणात्मक अभ्यास' हा प्रबंध लिहिला आणि पीएच.डी. पदवी मिळवली. 'ब्रिटिश भारतातील प्रांतीय अर्थव्यवस्थेची उत्क्रांती' या शीर्षकाखाली आठ वर्षांनंतर हा प्रबंध प्रकाशित झाला. डॉ. आंबेडकर मुंबईला परतले आणि सिडनहॅम कॉलेजमध्ये राजकीय अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून रुजू झाले. पण लंडनमध्ये कायदा आणि अर्थशास्त्राचे शिक्षण पुन्हा सुरू करण्यासाठी त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. कोल्हापूरच्या महाराजांनी त्यांना आर्थिक मदत केली. १९२४ मध्ये इंग्लंडहून परत आल्यानंतर त्यांनी पीडित-शोषित असलेल्या वर्गाच्या कल्याणासाठी त्यांनी एक संघटना सुरू केली. शिक्षणाचा प्रसार करणे, आर्थिक परिस्थिती सुधारणे आणि निराश वर्गाच्या तक्रारींचे प्रतिनिधित्व करणे ही या संघटनेची तत्कालीन उद्दिष्टे होती. तसेच ३ एप्रिल १९२७ रोजी 'बहिष्कृत भारत' हे वृत्तपत्र सुरू करण्यात आले. १५ ऑगस्ट १९३६ रोजी त्यांनी पीडित-शोषित वर्गाच्या हिताचे रक्षण करण्यासाठी 'स्वतंत्र मजूर पक्ष' या पक्षाची स्थापना केली. १९४२ मध्ये, भारताच्या गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी परिषदेत, कामगार सदस्य म्हणून त्यांची नियुक्ती झाली.

१९४६ मध्ये ते बंगालमधून संविधान सभेवर निवडून आले. त्याच वेळी त्यांनी 'शुद्र कोण होते?हे आपले पुस्तक प्रकाशित केले. स्वातंत्र्यानंतर, १९४७ मध्ये, नेहरूंच्या पहिल्या मंत्रिमंडळात त्यांची कायदा आणि न्याय मंत्री म्हणून नियुक्ती झाली. परंतु १९५१ मध्ये त्यांनी काश्मीर प्रश्न, भारताचे परराष्ट्र धोरण आणि हिंदू कोड बिल, याबाबत नेहरूंच्या धोरणावरून मतभेद व्यक्त करत आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला. भारताच्या राज्यघटनेचा मसुदा तयार करण्यामधील त्यांच्या योगदानाचा गौरव म्हणून, १९५२ मध्ये कोलंबिया विद्यापीठाने, त्यांना एलएल.डी.ची पदवी बहाल केली. १९५५ मध्ये त्यांनी थॉट्स ऑन लिंग्विस्टिक स्टेट्स हे आपले पुस्तक प्रकाशित केले. १२ जानेवारी १९५३ रोजी उस्मानिया विद्यापीठाने डॉ.बी.आर. आंबेडकर यांना डॉक्टरेट ही पदवी प्रदान केली. 'मी हिंदू म्हणून मरणार नाही' ही १९३५ साली येवला येथे केलेली आपली घोषणा, त्यांनी अखेर २१ वर्षांनंतर खरी ठरवली. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथील ऐतिहासिक समारंभात त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला आणि ६ डिसेंबर १९५६ रोजी त्यांचे निधन झाले. दरम्यान १९५४ मध्ये नेपाळ मध्ये काठमांडू येथे झालेल्या 'जागतिक बौद्ध धर्म परिषदेत', बौद्ध भिक्खूंनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना 'बोधिसत्व' ही पदवी प्रदान केली होती.

## मेळघाटातील आदिवासी महिलांना मिळाले आरोग्य कवच !

### भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना



**विशेष लेख**

अमरावती जिल्ह्यातील मेळघाट हा निसर्गसौंदर्याने नटलेला असला तरी, येथील दुर्गम भौगोलिक रचना आणि सामाजिक आव्हानांमुळे कुपोषण आणि माता-बाल आरोग्याचा प्रश्न नेहमीच संवेदनशील राहिला आहे. या पार्श्वभूमीवर, मेळघाटातील आदिवासी माता आणि बालकांना आरोग्याचे कवच प्रदान करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या महिला व बाल विकास विभागामार्फत 'भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना' राबविण्यात येत आहे. कुपोषणमुक्त मेळघाट हे स्वप्न साकारण्याच्या दिशेने ही योजना आरोग्यपूर्ण पिढीचा पाया रचत आहे.

भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेंतर्गत गरोदर स्त्रियांना व स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार देण्याची योजना १ डिसेंबर २०१५ पासून राज्यात सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत मेळघाटमध्ये दोन टप्प्यात कार्य करण्यात येते. पहिल्या टप्प्यात, आदिवासी क्षेत्रातील सर्व गर्भवती महिलांना त्यांच्या गर्भावस्थेच्या शेवटच्या सहा महिन्यांत आणि प्रसूतीनंतरच्या पहिल्या सहा महिन्यांपर्यंत (स्तनदा माता) चौरस आहार दिला जातो. यामध्ये केवळ पोट भरणे हा उद्देश नसून, आहारात प्रथिनांची आणि जीवनसत्त्वांची मात्रा वाढविण्यावर भर दिला जातो. अंगणवाडी केंद्रांच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या या जेवणात वरण, भात, भाजी, पोळी यासोबतच अंडी आणि पौष्टिक लाडूंचा समावेश असतो. मार्च २०२६ मध्ये, मेळघाटातील धारणी आणि चिखलदरा तालुक्यातील ५ हजार ८१६ मातांनी या अमृत आहाराचा लाभ घेतला असून, त्यावर ६० लाख रुपयांहून अधिक खर्च करण्यात आला आहे. यामुळे महिलांमधील रक्ताल्पतेचे (अ‍ॅनिमिया) प्रमाण कमी होण्यास मोठी मदत झाली आहे.

योजनेचा दुसरा आणि तितकाच महत्त्वाचा टप्पा म्हणजे ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना आठवड्यातून चार दिवस केळी, अंडी असा पूरक आहार दिला जातो. बालपणातील कुपोषण हे शारीरिक आणि बौद्धिक वाढीतील सर्वात मोठा अडथळा असते. हा अडथळा दूर करण्यासाठी बालकांना आठवड्यातून चार दिवस अंडी किंवा तत्सम प्रथिनयुक्त आहार दिला जातो. मार्च महिन्यात मेळघाटातील एकूण २८ हजार ९८५ बालकांपर्यंत हा लाभ पोहोचला आहे. बालकांच्या या पोषण आहारासाठी सुमारे ३६.३२ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती. मेळघाटातील ४६२ अंगणवाडी केंद्रांचे जाळे आणि तिथे कार्यरत असणाऱ्या स्थानिक आहार समित्या यामुळे ही योजना प्रत्यक्ष लाभार्थ्यांच्या घरापर्यंत पोहोचत आहे. या योजनेमुळे मेळघाटात मातांना सकस आहार मिळतो, तेव्हा जन्माला येणाऱ्या बाळाचे वजन सुदृढ असते, ज्यामुळे बालमृत्यूचे प्रमाण कमी होत आहे. तसेच, या योजनेच्या निमित्ताने महिलांचा अंगणवाडीशी संपर्क वाढल्यामुळे त्यांना लसीकरण, वैयक्तिक स्वच्छता आणि कौटुंबिक नियोजनासारख्या महत्त्वाच्या विषयांचे मार्गदर्शन सहज उपलब्ध होत आहे. स्थानिक महिलांचा आहार समित्यांमध्ये असलेला सहभाग त्यांच्यात निर्णयक्षमता आणि नेतृत्वाचे गुण विकसित करत आहे. भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना ही मेळघाटातील आदिवासी बांधवांच्या जीवनात चैतन्य फुंकणारी योजना ठरली आहे. जिल्हा प्रशासन आणि महिला व बालकल्याण विभाग यांच्या समन्वयाने राबविल्या जाणाऱ्या या उपक्रमामुळे दुर्गम भागातील माता आणि बालके आज खऱ्या अर्थाने सुरक्षित आणि सशक्त होत आहेत. कुपोषणाच्या अंधारातून आरोग्याच्या प्रकाशाकडे मेळघाटाची ही वाटचाल भविष्यात एक आदर्श आरोग्य मॉडेल म्हणून निश्चित समोर येईल.

**अपर्णा यावलकर**
माहिती अधिकारी,
जिल्हा माहिती कार्यालय, अमरावती.

## महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील घडामोडी



| | |
|---|---|
| १४ एप्रिल १८९१ | महू, मध्य प्रदेश येथे सैनिक छावणीत जन्म. |
| १९०७ | डॉ. आंबेडकरांनी मॅट्रिकची परीक्षा पास केली. |
| १९०७ | रमाबाई वलंगकर यांच्यासोबत विवाह. |
| १९१० | इन्टरमीडिएट परीक्षा उत्तीर्ण. |
| १९१२ | बी.ए. परीक्षा उत्तीर्ण. |
| २ फेब्रुवारी १९१३ | वडील सुभेदार रामजी यांचे निधन. |
| १ जून १९१३ | सयाजीराव गायकवाड यांनी विदेशात अध्ययनासाठी शिष्यवृत्ती बहाल केली. |
| १९१३ | उच्च शिक्षणाकरिता न्यूयॉर्क (अमेरिका) येथे रवाना. |
| १९१५ | अ‍ॅन्शंट इंडियन कॉमर्स या प्रबंधावर एम.ए.ची उपाधी बहाल. |
| जून १९१६ | नॅशनल डिविडंड ऑफ इंडिया ए हिस्टारिक अँड अनालिटिकल स्टडी प्रबंध कोलंबिया विद्यापीठाद्वारे स्वीकृत. |
| १९१६ | कास्ट इन इंडिया, देअर मेकॅनिझम जेनिसिस अँड डेव्हलपमेंट या निबंधाचे वाचन. |
| १९१६ | पीएच.डी.ची पदवी बहाल. |
| ११ नोव्हेंबर १९१८ | सिडेनहॅम कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्रोफेसर म्हणून नियुक्ती. |
| ३१ जानेवारी १९२० | राजर्षी शाहू महाराज यांच्या साहाय्याने मूकनायक पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित. |
| १ मार्च १९२० | माणगाव (कोल्हापूर) येथे बहिष्कृत परिषदेचे अध्यक्षपद. |
| १ मे १९२० | अखिल भारतीय बहिष्कृत परिषद, नागपूर. |
| १९२२ | बॅरिस्टरची परीक्षा पास |
| १९२३ | डॉक्टर ऑफ सायन्सची पदवी बहाल. |
| २० जुलै १९२४ | 'बहिष्कृत हितकारिणी' सभेची स्थापना, मुंबई |
| जुलै १९२६ | राजरत्न या मुलाचे निधन. |
| १९ मार्च १९२७ | कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद, महाड. |
| ३ एप्रिल १९२७ | बहिष्कृत भारत पाक्षिकाचे प्रकाशन. |
| १९२७ | मुंबई विधिमंडळात सदस्य म्हणून निवड. |
| ४ सप्टेंबर १९२७ | समाज समता संघाची स्थापना. |
| १३ नोव्हेंबर १९२७ | अमरावती येथे अंबादेवी मंदिर सत्याग्रह. |
| २५ डिसेंबर १९२७ | महाडचा सत्याग्रह आणि मनुस्मृती दहन. |
| जून १९२८ | मुंबई येथे सरकारी विधी महाविद्यालयात प्राध्यापक. |

| | |
|---|---|
| २९ जून १९२८ | समता पाक्षिकाचा आरंभ. |
| २३ ऑक्टोबर १९२८ | सायमन कमिशनपुढे साक्ष. |
| १९२९ | अस्पृश्यांसाठी ३३ टक्के आरक्षण ठेवण्याबाबत मुंबई विधिमंडळात भाषण. |
| ३ मार्च १९३० | काळाराम मंदिर, नाशिक सत्याग्रह प्रारंभ. |
| २ ऑक्टोबर १९३० | लंडन येथे गोलमेज परिषदेसाठी मुंबईहून रवाना. |
| नोव्हेंबर १९३० | गोलमेज परिषदेत अस्पृश्यांची बाजू ठामपणे मांडली. |
| २४ नोव्हेंबर १९३० | जनता साप्ताहिकाचा आरंभ. |
| १४ ऑगस्ट १९३१ | मणीभवन, मुंबई येथे गांधीजींसोबत पहिली भेट. |
| ८ ऑक्टोबर १९३१ | अल्पसंख्याकांच्या प्रश्नाबाबत गांधीजींच्या धोरणाला गोलमेज परिषदेत विरोध. |
| २६ नोव्हेंबर १९३१ | गांधी-आंबेडकर-पंचम जार्ज यांची भेट. |
| २५ सप्टेंबर १९३२ | पुणे करारावर स्वाक्षरी. |
| २७ मे १९३५ | पत्नी रमाबाई यांचे निधन. |
| २ जून १९३५ | मुंबई, विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य पदावर नियुक्ती. |
| १३ ऑक्टोबर १९३५ | येवला, हिंदू म्हणून जन्माला आलो, पण हिंदू म्हणून मरणार नाही. डॉ. आंबेडकरांची धर्मांतराची घोषणा. |
| मे १९३६ | 'जातिप्रथेचे उन्मूलन' भाषण प्रकाशित. |
| ३१ मे १९३६ | मुक्ति कोन पथे विख्यात भाषण, मुंबई |
| १५ ऑगस्ट १९३६ | स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना. |
| १७ फेब्रुवारी १९३७ | मुंबई असेंब्ली निवडणूक, डॉ. आंबेडकर विजयी. |
| १७ सप्टेंबर १९३७ | कोकणातील खोती नष्ट करण्याकरिता मुंबई विधिमंडळात बिल मांडले. |
| ४ जानेवारी १९३८ | पंढरपूर, मातंग परिषदेतर्फे मानपत्र अर्पण. |
| १२-१३ फेब्रुवारी १९३८ | मनमाड येथे अस्पृश्य रेल्वे कामगार परिषद. |
| मे १९३८ | मुंबई विधि महाविद्यालयाच्या प्राचार्य पदावरून राजीनामा. |
| सप्टेंबर १९३८ | औद्योगिक कलहाचे विधेयक मुंबई विधिमंडळात मांडले. |
| ७ नोव्हेंबर १९३८ | स्वतंत्र मजूर पक्षातर्फे सत्याग्रह. |
| जानेवारी १९३९ | महाड, शेतकरी परिषदेचे अध्यक्षपद- काँग्रेसच्या शेतकरी-विरोधी-धोरणावर टीका. |

| | |
|---|---|
| २२ जून १९४० | मुंबई, सुभाषचंद्र बोस यांच्यासोबत भेट. |
| १९४० | थॉट्स ऑन पाकिस्तान ग्रंथाचे प्रकाशन. |
| एप्रिल १९४२ | अखिल भारतीय शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना. |
| १९ जुलै १९४२ | भारतीय दलित वर्ग परिषद, नागपूर येथे हजर. |
| १९४२ | मजूर मंत्री म्हणून निवड. |
| १९ जाने.१९४३ | पुणे येथे विख्यात भाषण. रानडे, गांधी आणि जिन्ना. |
| जून १९४५ | काँग्रेस आणि गांधींनी अस्पृश्यांप्रति काय केले? ग्रंथ प्रकाशित. |
| २० जून १९४६ | मुंबई येथे सिद्धार्थ महाविद्यालयाची स्थापना |
| १९४६ | 'शूद्र पूर्वी कोण होते?' हा ग्रंथ प्रकाशित. |
| १७ डिसेंबर १९४६ | भारताला कोणतीही शक्ती एकात्मक होण्यापासून परावृत्त करू शकत नाही. संविधान सभेत भाषण. |
| ऑगस्ट १९४७ | भारताचे पहिले कायदे मंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश. |
| २९ ऑगस्ट १९४७ | संविधान मसुदा समितीच्या अध्यक्षपदावर निवड. |
| १५ एप्रिल १९४८ | डॉ. शारदा कबीर यांच्यासोबत विवाह. |
| ऑक्टोबर १९४८ | 'दि अनटचेबल्स' ग्रंथ प्रकाशित. |
| सप्टेंबर १९४८ | सरसंघचालक माधवराव गोळवलकर यांच्या सोबत भेट. |
| ४ नोव्हेंबर १९४८ | घटनेचा मसुदा घटना समितीसमोर ठेवला. |
| २५ नोव्हेंबर १९४९ | घटना समितीत देशभक्तीने ओथंबलेले समारोपीय भाषण. |
| २६ नोव्हेंबर १९४९ | घटना समितीने घटना स्वीकार केली. |
| मे १९५० | 'बुद्ध आणि त्यांच्या धम्माचे भवितव्य' लेख महाबोधी संस्थेच्या मासिकात प्रसिद्ध. |
| २५ मे १९५० | कोलंबोत विश्व बौद्ध परिषदेला उपस्थित. |
| १९ जून १९५० | औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय स्थापन. |
| मे १९५१ | लोकप्रतिनिधित्व विधेयक लोकसभेपुढे मांडले. |
| सप्टेंबर १९५१ | 'हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती' हा लेख महाबोधी मासिकामध्ये प्रकाशित. |
| २७ सप्टेंबर १९५१ | हिंदू कोडबिल व मागासवर्गीयांच्या आरक्षणाबाबत मंत्रिपरिषदेचा राजीनामा. |

| | |
|---|---|
| जानेवारी १९५२ | प्रथम सार्वत्रिक निवडणुकीमध्ये पराभव. |
| मार्च १९५२ | राज्यसभेसाठी निवड. |
| ५ जून १९५२ | कोलंबिया विद्यापीठातर्फे डॉक्टर ऑफ लॉज ही पदवी अर्पण. |
| १२ जानेवारी १९५३ | हैद्राबाद, उस्मानिया विद्यापीठातर्फे डॉक्टर ऑफ लिटरेचर पदवी अर्पण. |
| ३० जानेवारी १९५४ | महात्मा फुले बोलपट चित्रपटाच्या मुहूर्त समारंभास उपस्थित. |
| मे १९५४ | भंडारा पोटनिवडणुकीमध्ये पराभव. |
| ३ ऑक्टोबर १९५४ | आकाशवाणीवर माझे वैयक्तिक तत्त्वज्ञान भाषण. |
| २८ ऑक्टोबर १९५४ | माझे आयुष्य तीन गुरूंनी आणि तीन उपास्य दैवतांनी घडले. |
| डिसेंबर १९५४ | रंगून, तिसऱ्या जागतिक बौद्ध परिषदेला उपस्थित. |
| ४ मे १९५५ | भारतीय बौद्ध महासभा स्थापित. |
| ४ फेब्रुवारी १९५६ | मुंबई ही महाराष्ट्राची आहे, अशी ताकीद भारत सरकारला दिली. |
| २४ मे १९५६ | नरेपार्क येथे ऑक्टोबर महिन्यात मी बौद्धधर्माची दीक्षा घेईन, अशी घोषणा केली. |
| १४ ऑक्टोबर १९५६ | नागपूर येथे पूज्य भंते महास्थवीर चंद्रमणी यांच्या हस्ते पत्नीसोबत धम्मदीक्षा घेतली व नंतर आपल्या ५ लाख अस्पृश्य बंधूंना बौद्ध धम्माची दीक्षा दिली. |
| १५ ऑक्टोबर १९५६ | बौद्ध धम्म का स्वीकारला या विषयी सकाळी अभूतपूर्व भाषण व नागपूर म्युनिसिपल्टीतर्फे संध्याकाळी मानपत्र अर्पण. |
| १६ ऑक्टोबर १९५६ | चंद्रपूर येथे २ लाख अस्पृश्य बंधूंना धम्मदीक्षा दिली. |
| २० नोव्हेंबर १९५६ | काठमांडू, नेपाळ येथे जागतिक बौद्ध परिषदेत बुद्ध आणि कार्लमार्क्स हे अभूतपूर्व भाषण दिले. |
| ६ डिसेंबर १९५६ | दिल्ली येथे त्यांच्या निवासस्थानी महापरिनिर्वाण. |
| ७ डिसेंबर १९५६ | मुंबई येथे दादर चौपाटीच्या किनाऱ्यावर १० लाख लोकांच्या साक्षीने बौद्ध पद्धतीनुसार अंतिम संस्कार. |

संकलन :- विनोद मधुकर बोरकर, बार्शिटाकळी

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर **८३९०६७०९९९** या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.
त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज अकोला
मंगळवार, दि. १४ एप्रिल २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**अकोला:** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंती दिनी विनम्र अभिवादन करण्यात आले. अशोक वाटिकेत बाबासाहेबांना मानवंदना देण्यासाठी जनसागर लोटला होता. मंगळवारी सकाळ पासून अशोक वाटिकेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना देण्यासाठी गर्दी झाली होती. महापुरुषांच्या पुतळ्या समोर मेणबत्त्या लावण्यात आल्या. तसेच पुष्पहार वाहण्यात आले. शहरासह जिल्ह्यात महामानवाला विनम्र अभिवादन करण्यात आले.



































# सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

मंगळवार, दि. १४ एप्रिल २०२६ https://epaper.citynewssuperfast.com


## उन्हाचा कडाका वाढला ; यवतमाळात पारा ४३ अंशांवर

प्रतिनिधी १४ एप्रिल

**यवतमाळ :** जिल्ह्यात उन्हाचा कडाका दिवसेंदिवस तीव्र होत असून, तापमानाने चाळीशी ओलांडली आहे. सोमवारी तापमानात तब्बल ३.८ अंशांची वाढ होऊन यवतमाळमध्ये ४३.२ अंश सेल्सिअस इतक्या उच्चांकाची नोंद झाली. सकाळपासूनच सूर्याच्या कडक किरणांनी नागरिकांना त्रस्त केले, तर दुपारच्या सुमारास उष्णतेचा कहर अधिक जाणवला.

रात्रीचे तापमानही वाढले असून, किमान तापमान २७.२ अंशांवर पोहोचले आहे. त्यामुळे दिवसाबरोबरच रात्रीही उकाडा जाणवत असल्याने नागरिकांची झोप उडाली आहे. वाढत्या उष्णतेमुळे दुपारी बाहेर पडणे कठीण झाले असून, रस्तेही ओस पडल्याचे चित्र दिसत आहे. हवामान विभागाने येत्या आठवड्यात उष्णतेची लाट आणखी तीव्र होण्याचा इशारा दिला आहे. तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. विदर्भातील इतर भागातही उष्णतेचा तडाखा कायम असून, अकोला येथे सर्वाधिक ४३.८ अंश, तर अमरावती येथे ४३.२ अंश तापमानाची नोंद झाली आहे.

# भीमजयंती : योगानृत्य व लेझिम सादरीकरणाने जिंकली मने

प्रतिनिधी १४ एप्रिल

**यवतमाळ :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त यवतमाळ शहरात उत्सव साजरा करण्यात आला. १४ एप्रिल रोजी सकाळी ब्ल्यु शायरी ग्रुपने योगानृत्याचे आकर्षक सादरीकरण केले. त्यानंतर लेझिम पथकाने आपल्या सुसंगत तालावर नृत्य सादर करत वातावरण अधिक रंगतदार बनवले. या सादरीकरणामुळे उपस्थित नागरिकांची मने जिंकली आणि उत्सवाची उंची आणखी वाढवली. त्याच्या पश्चात, भिम गर्जना ढोल ताशा पथकाने शक्ती व उत्साह संचारला होता.










यवतमाळ शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त मोठ्या उत्साहात कार्यक्रम आयोजित करण्यात आले. १३ एप्रिल रोजी रात्री १२ वाजता संविधान चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी शहरातील नागरिकांची गर्दी झाली. स्मारक समितीच्या वतीने हारार्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी, नागरिकांनी निळे व पंचशिल ध्वज घेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जयघोष केला आणि बुध्द वंदना केली. आज, १४ एप्रिल रोजी सकाळी ब्ल्यु शायरी ग्रुपच्या वतीने योगानृत्य सादर केले. त्यानंतर लेझिम आणि भिम गर्जना ढोल ताशा पथकाने सादर केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक कृती समितीने सामुहिक बुंध्द वंदना केली.

यवतमाळ शहरात विविध सामाजिक उपक्रम देखील राबवले गेले. रक्तदान शिबिर, "एक वही एक पेन" उपक्रम आणि अनामी फाउंडेशनने विविध कार्यक्रम आयोजित केले. याव्यतिरिक्त, ३ प्रश्नांचा उत्तर दिल्यास एक ग्रंथ फ्री मिळण्याचा उपक्रम राबविण्यात आला. यवतमाळमधील बोधिसत्व चौक पाटीपूरा येथून मोटर सायकल रॅलीची सुरुवात करण्यात आली. ही रॅली डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, शारदा चौक, तहसील चौक, जाजु चौक, येरावार चौक, दाते कॉलेज चौक, बिरसा मुंडा चौक, दर्डा स्मारक लोहारा, संविधान चौक या मार्गाने मार्गस्थ झाली आणि महात्मा फुले चौक येथे समारोप करण्यात आला. यवतमाळच्या नागरिकांनी एकत्र येऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाची महती स्मरली आणि त्यांच्या कार्यावर अभिमान व्यक्त केला.

## कठडे नसलेल्या पुलाचा मृत्यूचा सापळा ; पैनगंगेत दुचाकी कोसळून आजी ठार, नातू गंभीर जखमी

प्रतिनिधी १४ एप्रिल

**उमरखेड :** मराठवाडा–विदर्भाला जोडणाऱ्या पैनगंगा नदीवरील खरबी पुलावर संरक्षक कठडे नसल्याने शनिवारी (दि. ११ एप्रिल) रात्री भीषण अपघात घडला. दुचाकी थेट नदीपात्रात कोसळून वृद्ध महिलेचा जागीच मृत्यू झाला, तर नातू गंभीर जखमी झाला आहे.

### प्रशासनाच्या दुर्लक्षावर संताप

■ पैनगंगा नदीवरील खरबी पुलावर संरक्षक कठडे नसल्याने तो अपघातांचा सापळा बनला आहे. कठडे वाहून गेल्यानंतरही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दुरुस्ती न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. "आणखी किती बळी गेल्यानंतर प्रशासन जागे होणार?" असा सवाल परिसरातील नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

धुपताबाई वामन साखरे (वय अंदाजे वृद्ध) असे मृत महिलेचे नाव असून सतीश इंगळे हा त्यांचा नातू गंभीर जखमी झाला आहे. दोघेही कोर्टा (ता. उमरखेड) येथून किनवटकडे दुचाकीने जात असताना रात्री सुमारे ९.३० वाजता हा अपघात घडला. अंधारात पुलावरून जाताना अंदाज न आल्याने आणि पुलाला कठडे नसल्याने दुचाकी थेट पैनगंगा नदीत कोसळली. घटनेची माहिती मिळताच दराटी व किनवट पोलिसांनी संयुक्तरित्या घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. जखमीस तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, दुचाकीही रात्रीच बाहेर काढण्यात आली.

या बचाव मोहिमेत किनवट ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक सागर झाडे, पोहेकॉ. गजानन डुकरे तसेच दराटी ठाण्याचे पोहेकॉ. एस. एन. रणवते, रविंद्र जाधव, अमोल गंगोमाड यांनी सहभाग घेतला.

## पाण्याचा टँकर पलटून युवकाचा मृत्यू

प्रतिनिधी १४ एप्रिल

**दारव्हा :** वर्धा–नांदेड रेल्वे मार्गासाठी सुरू असलेल्या पुलाच्या बांधकामस्थळी सुरक्षा उपाययोजनांचा अभाव पुन्हा एकदा जीवघेणा ठरला. पाण्याचा टँकर पलटून झालेल्या अपघातात रोशन भिमराव मेटे (रा. पेकर्डा) या युवकाचा मृत्यू झाला.

दारव्हा ते नेर मार्गावरील घाट किन्ही फाट्याजवळ अनेक दिवसांपासून पुलाचे बांधकाम सुरू आहे. या ठिकाणी रस्त्यावर मोठे चढ-उतार, धुळीचे साम्राज्य आणि



अपुऱ्या सुरक्षिततेमुळे वाहनचालकांना मोठा धोका निर्माण झाला आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार येथे सातत्याने अपघात घडत असूनही संबंधित प्रशासनाकडून ठोस उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत.

सोमवारी दुपारी सुमारे ४ वाजताच्या सुमारास पाण्याचा टँकर पलटून हा अपघात घडला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक रुग्णसेवक विक्की जामनकर यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत जखमी युवकाला ॲम्ब्युलन्सद्वारे उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले.

या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, बांधकामस्थळी तातडीने सुरक्षा उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

## पोफाळीत १८ एप्रिलला कृषी तंत्रज्ञान प्रशिक्षण कार्यशाळा

प्रतिनिधी १४ एप्रिल

**उमरखेड :** स्व. माणिकराव नानाजी शिरसागर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पोफाळी येथे विज्ञानसंत श्री. अंकुश पाटील कृषी तंत्रज्ञान प्रशिक्षण कार्यशाळा व अनुभव कथन शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आला आहे. आधुनिक शेतीत उत्पादन वाढ, खर्चात बचत आणि गुणवत्तापूर्ण पीक व्यवस्थापन याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

हा मेळावा शनिवार, दि. १८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता संत श्री गजानन महाराज मंदिर, पोफाळी (ता. उमरखेड, जि. यवतमाळ) येथे होणार आहे. या कार्यशाळेचे मार्गदर्शन विज्ञानसंत अंकुश पाटील (सांगली) करणार असून, शेतीतील नव्या प्रयोगांची प्रत्यक्ष माहिती व अनुभवकथन यामुळे शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे.

या कार्यशाळेत शेतकऱ्यांना घरच्या घरी वॉटर सोल्युबल खते तयार करण्याचे प्रशिक्षण, त्यांचा योग्य वेळापत्रकानुसार वापर तसेच कृषी संजीवके, कीटकनाशके व बुरशीनाशके तयार करण्याच्या पद्धती याबाबत सविस्तर मार्गदर्शन दिले जाणार आहे. यामध्ये ह्युमिक ॲसिड, फुल्विक ॲसिड, अमिनो ॲसिड, ऑर्थोसिलिक ॲसिड, लाईम सल्फर, सिलिकॉन स्टिकर, बायोझाईड, ऑर्गेनिक कार्बन, मिलीबग नियंत्रण औषधे तसेच विविध मायक्रो न्यूट्रिएंट्स यांची माहिती देण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन तालुका कृषी अधिकारी अभयकुमार वडकुते यांच्या हस्ते होणार आहे. उपक्रमाचे आयोजन सेवानिवृत्त उपविभागीय अभियंता राजेंद्र शिरसागर यांनी केले आहे.

शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आधुनिक शेतीतील तंत्रज्ञानाचा लाभ घ्यावा तसेच वह्या-पेन सोबत आणावेत, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. पोफाळी परिसरातील शेतकऱ्यांसाठी ही कार्यशाळा शाश्वत आणि फायदेशीर शेतीकडे नेणारी महत्त्वाची संधी ठरणार आहे.

## बोरी खुर्द ठरले 'लाउडस्पीकर मुक्त गाव'

प्रतिनिधी १४ एप्रिल

### उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार भोंगे हटविण्याची मोहीम

**पुसद :** उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आणि पोलीस विभागाच्या निर्देशांनुसार पुसद शहर हद्दीतील ग्राम बोरी खुर्द येथे विनापरवाना लावलेले लाउडस्पीकर (भोंगे) काढून टाकण्यात आले. दि. ११ एप्रिल २०२६ रोजी ही विशेष मोहीम राबविण्यात आली.

जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि उपविभागीय पोलीस अधिकारी हर्षवर्धन बी.जे. यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. यामध्ये जामा मस्जिद, अली मुर्तुजा मस्जिद, श्री संत दुधाधारी महाराज मंदिर तसेच धम्मभूमी बुद्ध विहार येथील भोंगे संबंधित विश्वस्त आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने स्वेच्छेने काढण्यात आले.

या उपक्रमामुळे ग्राम बोरी खुर्द हे "लाउडस्पीकर मुक्त गाव" म्हणून पुढे आले असून, ग्रामस्थांनी याबाबत अधिकृत ठराव करण्याचे आश्वासन



दिले आहे.

ही कारवाई ठाणेदार सेवानंद वानखेडे यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. यावेळी गोपनीय अंमलदार अभिमन्यू चव्हाण, नितेश भालेराव, बिट अंमलदार सुभाष जाधव आणि पोहेकॉ अविनाश राठोड उपस्थित होते.

पोलीस प्रशासनाने परिसरातील इतर धार्मिक व सामाजिक संस्थांनीही स्वयंस्फूर्तीने नियमांचे पालन करून लाउडस्पीकर हटविण्यास सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

## शेतातील विहिरीत शेतकऱ्याचा मृतदेह आढळला

प्रतिनिधी १४ एप्रिल

**दिग्रस :** येथील जुनी पोलीस वसाहत परिसरातील एका युवा शेतकऱ्याचा मृतदेह स्वतःच्या शेतातील विहिरीत आढळल्याने परिसरात खळबळ उडाली. ही घटना सोमवारी (दि. १३ एप्रिल) सकाळी सुमारे आठ वाजताच्या सुमारास उघडकीस आली.



मनीष आनंदराव दुधे (वय ३८, रा. जुनी पोलीस स्टेशन वसाहत, दिग्रस) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. दि. १० एप्रिल रोजी ते घरातून शेतात जाण्यासाठी निघाले होते. मात्र, त्यानंतर ते परत न आल्याने कुटुंबीयांनी त्यांचा शोध सुरू केला. दरम्यान, शेतातील विहिरीजवळ त्यांची चप्पल व दुचाकी आढळून आल्याने संशय बळावला होता. याप्रकरणी दिग्रस पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती. सोमवारी सकाळी विहिरीत त्यांचा मृतदेह पाण्यावर तरंगताना आढळून आला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह बाहेर काढून पंचनामा केला. त्यानंतर शवविच्छेदनासाठी मृतदेह दिग्रस ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला. प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. मृताच्या पश्चात आई-वडील, पत्नी, दोन मुली, एक भाऊ आणि एक बहीण असा मोठा परिवार आहे. त्यांनी आत्महत्या का केली याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, या प्रकरणी दिग्रस पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली.

## सहकारी संस्था राजकारणमुक्त झाल्यासच प्रगती शक्य – आमदार किसन वानखेडे

प्रतिनिधी १४ एप्रिल

**उमरखेड :** तालुक्यातील शेतकऱ्यांचे आर्थिक हित जपण्यासाठी कार्यरत असलेल्या सहकारी संस्थांमध्ये विकासकामे करताना राजकारण बाजूला ठेवले तरच संस्थांची खरी प्रगती साध्य होते, असे प्रतिपादन आमदार किसन वानखेडे यांनी केले. ते १३ एप्रिल रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत गुरांच्या उपबाजार येथे नवीन १४ दुकान गाळ्यांच्या भूमिपूजन सोहळ्यात बोलत होते.



या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपा जिल्हा समन्वयक नितीन भुतडा, माजी आमदार विजय खडसे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती कृष्णा पाटील देवसरकर, जिनिंग प्रेसचे अध्यक्ष शिवाजीराव माने, नितीन माहेश्वरी, माजी पं. स. सभापती प्रज्ञानंद खडसे, उपसभापती श्रीपाल आडे, बांधकाम विभाग प्रमुख भीमराव चंद्रवंशी, संचालक बाळासाहेब भट्टड, विवेक कन्नावार, जितेंद्र पवार, नगरसेविका करुणा कुबडे, डॉ. प्रतीक रुडे, शितल घोंगडे, स्वाती पाचकोरे तसेच बाजार समितीचे सचिव संदीप जाधव आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार वानखेडे म्हणाले की, सत्ता आल्यानंतर कृषी उत्पन्न बाजार समिती, सहकार महर्षी भाऊसाहेब माने जिनिंग प्रेस आणि खरेदी-विक्री संघ यांच्या माध्यमातून विविध विकासकामे राबविण्यात आली आहेत. यामध्ये शेतकरी विश्रामगृह, मा. जिजाऊ मार्केट, अहिल्याबाई होळकर कमान यांसारख्या प्रकल्पांचा समावेश आहे. या संस्थांना नफ्यात आणण्याबरोबरच शेतकरीहितासाठी गतिमान निर्णय घेण्यावर भर दिला जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी माजी आमदार विजय खडसे आणि सभापती कृष्णा पाटील देवसरकर यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बांधकाम समिती प्रमुख भीमराव पाटील चंद्रवंशी यांनी केले, सूत्रसंचालन सुधीर शिंदे यांनी तर आभार प्रदर्शन सभापती कृष्णा पाटील देवसरकर यांनी मानले.

## यवतमाळ वनवृत्तातील 32 वनरक्षकांना वनपालपदी पदोन्नती

प्रतिनिधी १४ एप्रिल

**यवतमाळ :** यवतमाळ वनवृत्तातील विविध संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीसाठी दि. 13 एप्रिल 2026 रोजी मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यवतमाळ यांच्या दालनात पदोन्नती समितीची बैठक पार पडली. या बैठकीत एकूण 32 वनरक्षकांना वनपाल पदावर पदोन्नती देण्याचा निर्णय घेण्यात आला.

यवतमाळ वनवृत्तात यवतमाळ, पांढरकवडा, पुसद, वाशिम हे प्रादेशिक वनविभाग, सामाजिक वनीकरण यवतमाळ व वाशिम तसेच वन्यजीव पांढरकवडा विभागांचा समावेश असून, या सर्व विभागांची आस्थापना मुख्य वनसंरक्षक (प्रा.) यवतमाळ यांच्या अखत्यारीत आहे.

पदोन्नती समितीच्या बैठकीस अध्यक्ष म्हणून डॉ. किशोर एस. मानकर (मुख्य वनसंरक्षक, प्रा.) यवतमाळ, तसेच सदस्य म्हणून सुमित कुमार (उपवनसंरक्षक, सामाजिक वनीकरण अमरावती), अभिजित वायकोस (उपवनसंरक्षक, वाशिम), उत्तम फड (विभागीय वनअधिकारी, पांढरकवडा) आणि सदस्य सचिव म्हणून प्रविण जाट उपस्थित होते.

या प्रक्रियेत एकूण 48 वनरक्षक, 1 लेखापाल, 4 लिपीक, 4 शिपाई आणि 1 वाहनचालक यांच्या सेवाविषयक नोंदींची सखोल तपासणी करण्यात आली. यामध्ये शैक्षणिक अर्हता, विभागीय परीक्षा, गोपनीय अहवाल, विभागीय चौकशी, न्यायालयीन प्रकरणे, मत्ता व दायित्व यांचा समावेश होता. समितीच्या शिफारशीनुसार 21 रिक्त वनपाल पदांवर तात्काळ पदोन्नती देण्यात आली असून, पुढील कालावधीत सेवानिवृत्ती व संभाव्य रिक्त पदांचा विचार करून ऑगस्ट 2026 पर्यंत आणखी 11 पदांवर पदोन्नती देण्यात येणार आहे. तसेच लिपीक, लेखापाल, शिपाई व वाहनचालक संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती व संवर्ग बदलाबाबतही निर्णय घेण्यात आला.

यामध्ये एका लिपीकास लेखापाल पदावर, एका शिपायास लिपीक पदावर, एका वाहनचालकास संवर्ग बदलाने लिपीक पदावर तर एका शिपायास नाईक पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. ही सर्व प्रक्रिया सेवाज्येष्ठता, कौटुंबिक परिस्थिती, पती-पत्नी एकत्रिकरण तसेच विशेष बाबींचा विचार करून पारदर्शकपणे राबवण्यात आली असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी

**अकोला :** न्यू इंग्लिश हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य माधव मुनशी होते, तर प्रमुख अतिथी म्हणून अकोला एज्युकेशन सोसायटीचे ज्येष्ठ उपाध्यक्ष डॉ. विजय नानोटी होते. उपमुख्याध्यापक उदय हातवळणे, पर्यवेक्षक हेमंत ओझरकर, सौ. अलका बाजरे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोज वाकोडे यांनी केले. तीर्था गोपाल धबाले हिने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा आढावा घेतला. अर्चना रंजनकर हिने 'मिलिंदपन्ह' ग्रंथातील नागसेन व राजा मिलिंद (मेनांडर) यांच्या संवादाविषयी सांगितले.

# संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात 'समता सप्ताह' उत्साहात संपन्न

प्रतिनिधी १४ एप्रिल

**अमरावती :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्ताने विद्यापीठातील संविधान शिल्प येथून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत भव्य रॅली काढण्यात आली. रॅलीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य कटआऊट लावण्यात आले होते. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांच्या प्रमुख उपस्थितीत रॅलीला सुरुवात झाली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीचे औचित्य साधून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या 'समता सप्ताहाचा' आज समारोप झाला. ८ एप्रिलपासून सुरू झालेल्या या सप्ताहात विविध प्रबोधनात्मक आणि शैक्षणिक कार्यक्रमांद्वारे समतेचा संदेश देण्यात आला. सर्वप्रथम

### विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना १३५ व्या जयंतीनिमित्त अभिवादन



कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून विद्यापीठाच्यावतीने त्यांना अभिवादन केले. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे उपस्थित होते.

**महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विद्यापीठाच्यावतीने अभिवादन**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने स्थानिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी हारार्पण करुन अभिवादन केले. त्या परिसरात लावलेल्या स्टॉलवर विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्यावतीने भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे व संत गाडगे बाबांनी दिलेला दशसूत्रीतील संदेश पशू, पक्षी, मुक्या प्राण्यांना अभय व तहानलेल्यांना पाणी नुसार मातीचे भांडे तसेच विविध ग्रंथांचे वाटप नागरिकांना करण्यात आले.

विद्यापीठ मागासवर्गीय कर्मचारी संघटनेतर्फे विविध वाचनालयांना स्पर्धा परीक्षा पुस्तके व ग्रंथ भेट

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मागासवर्गीय कर्मचारी संघटनेतर्फे भीम टेकडी येथील बौद्ध धम्म प्रचार समिती संचालित ग्रंथालयाला स्टील आलमारी, बळीगाव येथील श्रावस्ती अभ्यासिकेला रू. १५,५००/- किमतीची पुस्तके व ग्रंथ तसेच तपोवन येथील ज्ञानप्रतिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिकेला रू. २६,८००/- किमतीची पुस्तके व ग्रंथ भेट देण्यात आले. त्यामुळे स्पर्धा परीक्षेची तयारी करणाया विद्यार्थ्यांसाठी उपयोगी ठरणार आहे.

याप्रसंगी बोलताना कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते म्हणाले, ८ एप्रिल रोजी या समता सप्ताहाचे उद्‌घाटन झाले आणि आज १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीदिनी याचा समारोप होत आहे. या आठवडाभरात राबवण्यात आलेल्या उपक्रमांतून समतेचा मंत्र संपूर्ण शहरात, राज्यात आणि विशेषतः विद्यार्थी वर्गात पोहोचवण्याचा प्रयत्न विद्यापीठाने केला आहे. सामाजिक समताच्या निमित्ताने यापुढे विद्यार्थ्यांना वाटचाल करावयाची असून बाबासाहेबांच्या विचारांचा प्रसार व प्रचार करायचा आहे, त्यासाठी विद्यार्थ्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन याप्रसंगी करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या सर्वांना शुभेच्छा दिल्यात. यावेळी विद्यापीठातील सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी कर्मचारी व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

## परतवाडा येथे तरुणींना आमिष दाखवून अश्लील व्हिडिओ बनवले

प्रतिनिधी १४ एप्रिल



**अमरावती:** महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्यात परतवाडा शहरात सोशल मीडियाद्वारे तरुणींना लक्ष्य केल्याचे गंभीर आरोप समोर आले आहेत. या घटनेनंतर परिसरात संतापाचे वातावरण असून, आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

यासंदर्भाची माहिती मिळताच राज्यसभा खासदार अनिल बोंडे, भाजपचे प्रवक्ते शिवराय कुलकर्णी आणि भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी थेट जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय गाठून या गंभीर मुद्द्यांवर जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांची त्यांनी भेट घेऊन या विषयावर या प्रकरणाचा तातडीने तपास करून आरोपीला अटक करण्याची मागणी देखील यावेळी करण्यात आली होती. परतवाडा येथील रहिवासी एका मुस्लिम तरुणाने फेसबुकसारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा वापर करून अनेक तरुणींशी संपर्क साधला. त्याने त्यांच्याशी फसवणूक करून संबंध प्रस्थापित केले आणि त्यांच्या इच्छेविरुद्ध शारीरिक संबंध ठेवले, असा त्याच्यावर आरोप आहे. इतकेच नाही, तर या घटनांचे व्हिडिओ बनवून ते सोशल मीडियावर शेअर केल्याचाही त्याच्यावर आरोप आहे.या घटनेनंतर विविध संघटना आणि समाजातील सदस्यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. हिंदुत्ववादी नेते प्रवीण तोगडिया यांनी या घटनेचा तीव्र शब्दांत निषेध केला असून, आरोपीला तात्काळ अटक करून कठोर शिक्षा देण्याची मागणी केली आहे.

राज्यसभा खासदार अनिल बोंडे यांनीही या घटनेवर नाराजी व्यक्त केली असून, या घटनेची निष्पक्ष आणि सखोल चौकशी होऊन पीडितांना न्याय मिळावा, असे म्हटले आहे.

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस प्रशासनाने चौकशी सुरू केली आहे. विविध सामाजिक संघटनांनीही प्रशासनाने लवकरात लवकर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

**'रंगीला' तरुणाला अटक**

**अमरावती :** मुलींच्या व्हायरल व्हिडिओ प्रकरणी परतवाडा पोलिसांनी एका रंगीला तरुणाला ताब्यात घेतले आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार परतवाडा पोलिसांनी अयान अहमद तनवीर अहमदला ताब्यात घेतले. त्याने अनेक तरुणींना प्रेमाच्या जाळ्यात अडकवून आक्षेपार्ह व्हिडिओ बनवले होते. त्याने सोशल मीडियावर डझनभर व्हिडिओ व्हायरल केले होते. हे प्रकरण उघडकीस येताच जुळया शहरांसह संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली होती. भाजपसह हिंदुत्ववादी संघटनांनी चौकशी आणि अटकेची मागणी केली होती. अयान अहमद आपल्या कुटुंबासह फरार झाला होता, पण पोलिसांनी त्याला शोधून काढले.

## लोकशाही दिनात दाखल प्रकरणांच्या निपटाऱ्यासाठी प्रयत्न करा - अपर आयुक्त संजय जाधव

प्रतिनिधी १४ एप्रिल

**अमरावती:** विभागीय लोकशाही दिनात दाखल होणाऱ्या प्रकरणांवर विहीत कालमर्यादेत कार्यवाही करुन अंतिम अहवाल सादर करणे तसेच संबंधित अर्जदारास केलेल्या कार्यवाहीबाबत अवगत करणे आवश्यक आहे. यानुसार प्रत्येक विभागाने त्यांच्याकडील प्रलंबित प्रकरणांच्या संदर्भात प्रत्यक्ष स्थळ पाहणी, चौकशी अहवाल आदींची पडताळणी करुन प्रकरणांचा निपटारा होण्याच्या दृष्टीने जाणीवपूर्वक प्रयत्न करावे, असे निर्देश अपर आयुक्त संजय जाधव यांनी संबंधित विभागप्रमुखांना आज दिले. लोकशाही दिनात दाखल एकूण १५ प्रकरणांवर चर्चा करुन त्यानुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचनाही

### भागीय लोकशाही दिनात पंधरा प्रकरणांवर सुनावणी



त्यांनी संबंधित विभागाला दिल्या.

विभागीय आयुक्तालयाच्या सभागृहात . जाधव यांच्या अध्यक्षतेखाली लोकशाही दिनाचे कामकाज आज पार पडले. यावेळी उपायुक्त संतोष कवडे यांच्यासह महसूल, पोलीस, महापालिका, सहकार, कृषी, जलसंधारण व ऊर्जा विभागाचे अधिकारी प्रत्यक्षरित्या तर पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व संबंधित अधिकारी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून बैठकीला उपस्थित होते.


यावेळी विभागीय लोकशाही दिनात अमरावती विभागातून दाखल एकूण १५ प्रकरणांवर चर्चा करुन प्रत्येक तक्रारींच्या अनुषंगाने सविस्तर आढावा घेण्यात आला. ही प्रकरणे तत्काळ निकाली काढण्यासाठी संबंधित विभागांनी स्थळ पाहणी, मुद्देनिहाय चौकशी, पडताळणी करुन सुस्पष्ट अंतीम अहवाल तत्काळ सादर करावेत, असे निर्देश श्री. जाधव यांनी यावेळी दिले. विभागीय महिला लोकशाही दिनांतर्गत एकही प्रकरण दाखल झाली नाही, अशी माहिती महिला व बालविकास विभागाव्दारे देण्यात आली.

यावेळी लोकशाही दिनासाठी अमरावती विभागातून उपस्थित राहिलेल्या तक्रारदारांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. मागील लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे नवीन लोकशाही दिनात सुनावणीसाठी येवू नये. न्यायप्रविष्ट किंवा अर्धन्यायिक प्रकरणांसंदर्भात तत्काळ अहवाल सादर करण्यात यावा. लोकशाही दिनासाठी दाखल होणाऱ्या तक्रार अर्जांवर वेळेत कार्यवाही होण्यासाठी संबंधित विभागाने जबाबदारीपूर्वक प्रयत्न करावे, अशा सूचना श्री. जाधव यांनी केल्या.

## बच्चू कडू यांनी केला एव्हरेस्ट शिखराचा बेस्ट कॅम्प सर

प्रतिनिधी १४ एप्रिल

**अमरावती :** १३ एप्रिल २०२६ रोजी माजी मंत्री बच्चू कडू यांनी जगातील सर्वात उंच असणारे एव्हरेस्ट शिखराच्या बेस कँप पर्यंत मजल मारली. ५३६४ मीटर (१७५९४ फुट) पर्यंत ८ दिवस ट्रेक करत बोचणारी उणे १५ डिग्री सेल्सियस थंडी मधे काहीही VIP सुविधा नसताना हा खडतर ट्रेक स्वतःच्या मुला सोबत द अल्पायनिस्ट संस्थेच्या माध्यमातून एव्हरेस्टवीर भगवान चवले यांच्या मार्गदर्शनाखाली पुर्ण केला. हा ट्रेक खुप अवघड असा ट्रेक असून सलग ८ दिवस या बेस कँप पर्यंत चढाई करावी लागते. जसे जसे



उंच जावे तसं तसे नक्सिजनचे प्रमाण कमी होत जाते. बेस कँप वर फक्त ४५ ऑक्सिजनचे प्रमाण आहे. हाडे गोठवणारी थंडी आणि श्वसनाला होणारा त्रास अशा खडतर परिस्थितीत त्यांनी १४ सवंगड्यासह हा ट्रेक यशस्वी पुर्ण केला. महाराष्ट्रातील कदाचीत पहिले राजकीय व्यक्ती असावेत. या दररोज साधारणतः १२ ते १४ किमी चा ट्रेक तोही कमी ऑक्सिजन मधे करत. शेवटच्या दिवशी तब्बल १७ किमी चा ट्रेक करावा लागला. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीच्या पुर्व संध्येला भारताचे संविधान व भगवद्गीता यांना ही मोहिम समर्पित केली. नेपाळ मधे ज्या सोयी सुविधा ट्रेक साठी तयार केल्या आहेत. त्या सुविधा महाराष्ट्रातही केल्या जाव्यात ही इच्छा त्यांनी व्यक्त केली.

## अकोला-वाशीम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

प्रतिनिधी १४ एप्रिल

**अकोला:** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आज, १४ एप्रिल २०२६ रोजी अकोला-वाशीम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मुख्य कार्यालयात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती बँकेत मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी बँकेचे अध्यक्ष डॉ. जयराज कोरपे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर



यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी बोलताना डॉ. कोरपे यांनी महामानवाच्या विचारांची आजच्या काळात असलेली गरज आणि त्यांच्या कार्याचा गौरव केला.

या कार्यक्रमास बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनंत वैद्य यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच बँकेचे विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बँकेच्या जनसंपर्क विभागाने विशेष परिश्रम घेतले.





## एमराल्ड कॉलनीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी

**अकोला :** शहरातील गीता नगर परिसरातील एमराल्ड कॉलनी येथे मंगलम फाउंडेशन, मंगलम पंचमंडळ आणि मंगल मैत्री महिला मंडळ यांच्या वतीने महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली. यानंतर वंदना व सत्कार कार्यक्रम संपन्न झाला. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा समाजावर झालेला प्रभाव अधोरेखित केला. कार्यक्रमाचा समारोप भोजनदानाने करण्यात आला. यावेळी परिसरातील मोठ्या संख्येने नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

## राष्ट्रीय लहूशक्ती संघटनेतर्फे जिल्हाधिकारी यांना निवेदन

प्रतिनिधी १४ एप्रिल

**अकोला:** राष्ट्रीय लहुशक्तीच्या आज वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले, निवृत्त न्यायमूर्ती अनंत बदर समितीकडून अनुसूचित जाती आरक्षण वर्गीकरण अहवाल स्वीकारल्या बाबत त्यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले असून सामाजिक भूमिका मांडण्याकरता संघटनेचे प्रमुख पदाधिकाऱ्यांना वेळ देण्याची मागणी यावेळी करण्यात आली. अनुसूचित जाती आरक्षण वर्गीकरणांमध्ये सामाजिक शैक्षणिक नोकरी विषयक क्षेत्राच्या वर्गीकरणाबरोबरच अनुसूचित जातीमधील आर्थिक विषमता लक्षात घेता आर्थिक क्षेत्रातही शासकीय योजनांचे वर्गीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे. यामध्ये महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विविध मंडळांना दिला जाणारा निधी, केंद्र सरकारकडून मिळणारा स्पेशल कंपोनंट प्लांट चा निधी, बार्टी इत्यादी स्वायत्त संस्थांना मिळणारा निधी अशा सर्व आर्थिक स्वरूपाच्या योजनांचे वर्गीकरण करून उपेक्षित वंचित राहिलेल्या अनुसूचित जातीतील



समाज घटकांना आर्थिक दृष्ट्या सवड करून न्याय द्यावा अशी मागणी सुद्धा यावेळी राष्ट्रीय लहुशक्ती संघटनेतर्फे करण्यात आली. याचबरोबर अनुसूचित जाती आरक्षण वर्गीकरण करताना अ ब क या तीन वर्गात विभागणी करून अनुसूचित जातीमधील समाज बांधवांची सामाजिक शैक्षणिक, नोकरी विषयक व आर्थिक स्थितीचे अवलोकन करून अनुसूचित जातीतील ५९ जातीची वरील तीन स्तरांमध्ये विभागणी करावी, याचबरोबर अनुसूचित जाती आरक्षण वर्गीकरणाचा निर्णय होईपर्यंत शासनातर्फे कोणत्याच प्रकारची नोकर भरती करू नये अशी मागणी सुद्धा यावेळी संघटनेच्या माध्यमातून करण्यात आली आहे.

## श्री शिवाजी हायस्कूल तेल्हारा येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

प्रतिनिधी १४ एप्रिल

**तेल्हारा:** येथील श्री शिवाजी हायस्कूल तेल्हारा व श्रीमती पार्वती देवी तापडिया कॉन्हेट तेल्हारा यांच्या संयुक्त विद्यमाने भारत रत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्सवात साजरी करण्यात आली आहे यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शांतीकुमार प्रभाकरराव सावरकर प्र. मुख्याध्यापक हे होते तर अतिथी म्हणून उपस्थित सुनील वंजारी शिक्षक प्रतिनिधी विजय दहे शिक्षकेतर कर्मचारी वर्ग प्रतिनिधी बी जी पवार उपस्थित होते यावेळी उपस्थित मान्यवर मंडळी हस्ते भारत रत्न डॉ



बाबासाहेब आंबेडकर व शिक्षण महर्षी डॉ पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करण्यात आला आहे.

शाळेतील विद्यार्थ्यांनी गित गायन, विचार व्यक्त केले आहे यामध्ये कु शेजल परनाटे वर्ग ५वा कु सोनल वाघमारे वर्ग ९वा कु. साक्षी हेरोडे कु सदब शे.अजुम यांनी सहभाग घेतला आहे

जयंती निमित्त रंग भरणं स्पर्धा चे आयोजन करण्यात आले होते कु सदब शे अंजुम हिने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे चित्र काढून प्रथम क्रमांक पटकाविला आहे.

कार्यक्रम चे सुत्रसंचालन रूपचंद गाढवे सर यांनी केले आहे तर आभार प्रदर्शन कु खुशी शामसकार हिने मानले आहेत कार्यक्रम ला सर्व शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी वर्ग विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी वर्ग विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले आहेत.

## निधन वार्ता

### डॉ. प्रभाकर सेवनकर


**आलेगांव:** पंचक्रोशीतील रुग्णांना मोफत वैद्यकीय सेवा देणारे डॉ. प्रभाकर सेवनेकर (आबा) यांचे आज सकाळी ९.३० अकोला येथील खासगी रुग्णालयात निधन झाले. अंत्ययात्रा संध्याकाळी ५ .३० वाजता त्यांच्या राहत्या घरुन निघेल.



६

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

मंगळवार दि. १४ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com





# निळ्या पाखरांचे महामानवाला अभिवादन !

## *विविध उपक्रमाने जिल्ह्यात भीम जयंती उत्साहात साजरी * ठिकठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शहरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मोठ्या उत्साहात ठिकठिकाणी साजरी करण्यात येत आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सवाची गेल्या काही दिवसांपासून जय्यत तयारी सुरू होती. त्या निमित्ताने जिल्हाभरात विविध उपक्रम राबविण्यात आले.

प्रज्ञासुर्य, बोधिसत्व, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती शहरात मोठ्या हर्षोल्हासात साजरी करण्यात आली. या मध्ये नागरीकांनी मोठ्या हर्षोल्हासात पांढरे शुभ्र वस्त्रे परिधाण करून सहभागी झाले होते. थोर विद्वान तथा भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, प्रज्ञासुर्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती सर्वत्र मोठ्या हर्षोल्हासात साजरी होत आहे. भिम गीताचा कार्यक्रम भोजन दानासह विविध उपक्रम राबविण्यात आले. शहरात देखील महामानवाची जयंती साजरी करण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने अथक परीश्रम घेतले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उत्सव समितीचे अध्यक्ष तेजराव वानखेडे हे होते. तर ध्वजारोहण डॉ. सतीन मेश्राम यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी बाबासाहेबाला अभिवादन केले. नगराध्यक्ष अनिल केंदळे, जि. प. पतसंस्थेचे अध्यक्ष विजय मनवर, रोखठोक समितीचे प्रा. दिलीप जोशी सर, प्रतिभाताई सोनुने, डॉ. सिध्दार्थ देवळे, डॉ. तुषार गायकवाड, मिलींद उके, विनोद पट्टेबहादूर, अनिल ताजणे, माणिकराव सोनोने, संगिता इंगोले यांची उपस्थिती होती. यावेळी महामानवाला खा. संजय देशमुख, आ. भावनाताई गवळी, आ. श्याम खोडे, आ. अमित झनक, आ. ॲड. किरण सरनाईक, माजी आ. विजयराव जाधव, माजी जि.प. अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे, गोपाळराव आटोटे, रामप्रभु सोनोने, माधवराव काकडे गुरुजी, अशोक हेडा, मनिष मंत्री, दत्तराव इढोळे, लक्ष्मणराव इंगोले, मधुकरराव जुमडे, रिपाई अध्यक्ष तेजराव वानखेडे, जेष्ठ पत्रकार माधवराव अंभोरे, विजय मनवर, दिलीप देशमुख, सुभाष राठोड, राजुभाऊ चौधरी, राहुल तुपसांडे, गजानन ठेंगडे, चक्रधर गोटे, डॉ. अनिल कावरखे, पुरणमल बदलाणी, कालीसेठ जीवनाणी, जुगलकिशोर कोठारी, सुरेश मापारी, सुधिर कव्हर, किरणताई गिन्हे, वैशालीताई मेश्राम, नारायणराव काळबांडे, गोवर्धन चोथमल, राजकुमार पडघाण, अनंतकुमार जुमडे, राहुल तुपसांडे, वसंतराव इंगोले, अनिल अढागळे, डॉ. विलास इंगळे, डॉ. अविनाश झरे,



डॉ. नरेश इंगळे, डॉ. माधव हिवाळे, डॉ. संजय वानखडे, डॉ. अल्का मकासरे, मोहन सिरसाट, सुभाषराव अंभोरे, उमेश मोहळे, राजाभैया पवार, गजानन भांदुर्गे, नामदेव हजारे, संतोष शिंदे, नितीन मडके, गजानन भोयर, दिलीप जोशी, मुस्तफाभाई, मोहन गायकवाड, सुरज चौधरी, मा. कपील सारडा, मा. राजु जानीवाले घोडीवाले, वसंतराव धाडवे, मोहम्मद काशिब जावेद पलेहवान, रमेश गरपाल, मा.प्रा. सुरेंद्र वानखडे, गजानन वाघ, राजेंद्र अहिर, अरुणाताई ताजणे, विजय खानझोडे, डॉ. मंजुश्री जांभरुणकर, विजयराव काळे, अरुणाताई अवचार, सतिश खंडारे, शोभाताई जोधळे, समाधान कांबळे, अनिल कांबळे, सिध्दार्थ गायकवाड, राजु दारोकर, श्रीमती अन्नपुर्णा कंकाळ, प्रकाश कांबळे, संतोष सरकटे, दिलीप काष्टे, सोनाजी इंगळे, गोविंदराव इंगळे, मिलींद कांबळे, अनंता तायडे, जग्गु राऊत, सरकार इंगोले, बापु ठाकुर, नितिन उलेमाले, विशाल खंडेलवाल, सुभाष चौधरी, संजय मापारी, गजानन गोटे, सुशिलकुमार भिमजियाणी, दत्तराव गोटे, आशिष कोठारी, रामकृष्ण कालापाड, कादरभाई, सिताराम जाधव, भाऊ जाधव यांची उपस्थिती होती.

जयंती उत्सव सोहळ्याला व कार्यक्रमासाठी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष तेजराव वानखेडे सचिव शेषराव धांडे, कार्याध्यक्ष दौलतराव हिवराळे, अरविंद उचित, रमेश भगत, निलेश सोमाणी, वैभव उलेमाले, सोनाजी इंगळे, डिंगाबर साबळे, शेषराव मेश्राम, जगदिश मानवतकर, माधवराव जमधाडे, प्रेमचंद कांबळे, सुनिल तायडे, बाळासाहेब रोकडे, शीलक वानखेडे, बाळासाहेब लेमले, महादेव कांबळे, राहुल बलखंडे, भाऊराव डोंगरे, अजय ढवळे, विनोद तायडे, संतोष वानखेडे, दिलीप डोंगरे, सुनिल कांबळे, बबनराव खिल्लारे, प्रमोद खडसे, संजय खडसे, विशाल राऊत, पप्पु घुगे, गजानन गवई, दादाराव गायकवाड, दिनेश पठाडे, प्रविण पट्टेबहादूर, यांच्यासह सोशल ॲक्टीवा फोरम, बौध्द कर्मचारी बहुउद्देशिय प्रबोधन मंडळ, संघ मित्रा धम्मसेवा महिला मंडळ, कॉस्ट्राईब कर्मचारी संघटना, कृषी कर्मचारी संघटना, आदर्श बहुजन शिक्षक संघ, भारतीय बौध्द महासभा, ग्रा.पं. अधिकारी संघटना, त्रिरत्न बुध्द विहार समिती, त्रिदिप माजी सैनिक संघटना व डॉ. बाबासाहेब आंबेडकर पत्रकार महासंघाच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

**मंगरूळपीर :** येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना १३५ व्या जयंतीनिमित्त संभाजी ब्रिगेड समता सैनिक दल व विविध सामाजिक संघटनांनी अभिवादन केले. सकाळपासूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी शहरासह ग्रामीण भागातील समाज बांधवांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहून बाबासाहेबांना हार अर्पण करून अभिवादन केले.

## प्रभाग ६ मध्ये मतदार यादीचे सखोल पडताळणी (SIR) नोंदणी कार्यक्रम



● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

कारंजा लाड येथे नगरपरिषद प्रभाग क्रमांक ६ मध्ये मतदार यादी चे सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाचे आयोजन नूतन सभागृह येथे करण्यात आले होते.

सविस्तर माहिती अशी की शासनाने एस.आर.आय म्हणजेच मतदार यादीची सखोल पडताळणी पुन रीक्षण हा कार्यक्रम हाती घेतला आहे.त्या अनुषंगाने प्रभागांमधील नागरिकांना मतदार यादीची पडताळणी करताना त्रास होऊ नये या करिता कारंजा नगरपरिषद प्रभाग क्रमांक सहा मध्ये नगरसेविका सौ.वैशालीताई गुल्हाने व नगरसेवक सच्चिदानंद छद्दाणी यांनी कॅम्पचे आयोजित केला होते.त्यामध्ये ज्या नागरिकाचे नाव २००२ च्या मतदार यादीत नाही त्यांना नोंदणी करता येईल.तसेच नवीन मतदान नोंदणी नाव व माहिती दुरुस्ती त्यासाठी आवश्यक कागदपत्रे आधार कार्ड ची झेरॉक्स,वीज बिल ची झेरॉक्स,एक पासपोर्ट फोटो लागणार आहे.यावेळी बूथ क्रमांक १२०,१२१, १२२ चे बी.एल.ओ उपस्थित होते.

यावेळी प्रभागामधील अनेक नागरिकांनी या कॅम्पचा लाभ घेतला.यावेळी नगरसेविका सौ.वैशालीताई गुल्हाने, नगरसेवक सच्चिदानंद छद्दाणी, कौस्तुभ डहाके,ओम गुल्हाने,आशिष गावंडे हे उपस्थित होते. यावेळी वार्डाचे सर्व्हेक्षण करण्यात आले.



















संविधान वाटप करतांना जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, नगराध्यक्ष अनिल केंदळे, निवासी जिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, सभापती राहुल तुपसांडे, उत्सव समितीचे अध्यक्ष तेजराव वानखेडे, नगरसेवक बाळु मुरकूटे, अनिल ताजणे हे उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा

मंगळवार, दि. १४ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## आम्ही पोलीस आहोत' असे सांगून भरदिवसा फसवणूक

**देऊळगाव राजा :** शहरात दिवसाढवळ्या धक्कादायक फसवणुकीची घटना उघडकीस आली असून, 'आम्ही पोलीस आहोत' अशी बतावणी करत दोन अज्ञात इसमांनी शेतकऱ्याची सोन्याची अंगठी लंपास केल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, काशीनाथ त्रंबक डोईफोडे (वय ५५, रा. डोलखेडा खुर्द, ता. जाफ्राबाद, जि. जालना) हे २ एप्रिल रोजी दुपारी सुमारे २:४५ वाजता देऊळगाव राजा येथील भगवती स्वीट मार्ट समोर उभे असताना ही घटना घडली. यावेळी दोन अनोळखी इसमांनी स्वतःला पोलीस असल्याचे सांगत डोईफोडे यांना गाठले. विश्वास बसावा म्हणून त्यांनी चौकशीच्या बहाण्याने त्यांच्या हातातील ९ ग्रॅम सोन्याची अंगठी (किंमत अंदाजे २७,०००) काढून घेतली. त्यानंतर अत्यंत चलाखीने खऱ्या अंगठीऐवजी नकली अंगठी त्यांच्या हातात देत आरोपींनी पोबारा केला.

# घर फोडून लाखोंचा ऐवज लंपास

प्रतिनिधी १४ एप्रिल

**डोणगाव :** येथील वार्ड क्रमांक २ मधील खंडोबा परिसरात धाडसी चोरीची घटना उघडकीस आली आहे. डॉ. गजानन प्रल्हादराव पातुरकर यांचे बंद घर फोडून अज्ञात चोरट्यांनी सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह लाखो रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. ही घटना ९ ते १३ एप्रिलच्या दरम्यान घडली.



मिळालेल्या माहितीनुसार, डॉ. पातुरकर हे ९ एप्रिल रोजी घराला कुलूप लावून सहकुटुंब ट्रिपसाठी बाहेरगावी गेले होते. याचाच फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. घरातील बेडरूममधील कपाट फोडून चोरट्यांनी सोन्याच्या अंगठ्या, झुमके, नथ, गंठण आणि चांदीच्या वस्तू चोरून नेल्या. पोलिस दप्तरी नोंद आणि प्रत्यक्ष चोरीत तफावत आहे डॉ. पातुरकर यांच्या तक्रारीनुसार पोलिसांनी १ लाख ७३ हजार रुपयांच्या मुद्देमालाची चोरी झाल्याचा गुन्हा दाखल केला आहे. यामध्ये ७ ग्रॅमची सोन्याची अंगठी, सोन्याचे झुमके, २० ग्रॅमचे गंठण अशा विविध वस्तूंचा समावेश आहे. मात्र, पोलिसांनी ही किंमत जुन्या पावत्यांनुसार लावली आहे. आजच्या बाजारभावानुसार या सोन्याची किंमत कित्येक पटीने जास्त आहे. याबाबत डॉ. पातुरकर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, 'माझे जवळपास साडे दहा तोळे सोने आणि अर्धा किलो चांदीचे साहित्य चोरीला गेले आहे. परंतु, माझ्याकडे ज्या वस्तूंच्या पावत्या उपलब्ध होत्या, तेवढीच तक्रार पोलिसांनी नोंदवून घेतली आहे. या प्रकरणी डोणगाव पोलिसांनी अज्ञात चोरट्यां विरुद्ध कलम ३३१(३), ३३१ (४), ३०५ बिएनएसनुसार गुन्हा दाखल केला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल संजय धिके करत आहेत. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असूचाची चोरट्यांचा बंदोबस्त आहेत. याआधी सुद्धा मोठ्या प्रमाणात डोणगाव व परिसरात चोरीच्या घटना घडल्या असून अद्यापही त्या घटनेचा तपास लागलेला नसून शेती अवजारे सुद्धा मोठ्या प्रमाणात चोरीला गेले आहेत. मात्र त्यांच्या सुद्धा साध्य तक्रारी सुद्धा पोलिसांनी दाखल केल्या नाही.

## परीक्षेच्या काळात बसफेऱ्यांचे नियोजन कोलमडले

### नरवेल परिसरातील विद्यार्थ्यांना फटका

प्रतिनिधी १४ एप्रिल

**खामगाव :** सध्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरू असताना बससेवेचा बोजवारा उडाल्याचे चित्र समोर येत आहे. वेळेवर बस न आल्याने अनेक विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी उशीर होत असून, काहींवर परीक्षेला मुकण्याची वेळ आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. विद्यार्थी सकाळी लवकर घरातून निघत असले तरी बससेवेतील नियोजनाच्या अभावामुळे त्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. त्यामुळे नाराजी वाढली असून, बसफेऱ्यांचे योग्य नियोजन करण्याची मागणी होत आहे. दहावी-बारावीच्या परीक्षा संपल्यानंतर अनेक विद्यार्थ्यांनी क्लासेस सुरू केले असून, त्यांनाही



बससेवेच्या अनियमिततेचा फटका बसत आहे. परिणामी, शैक्षणिक नुकसान होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. दरम्यान, बस उशिरा येत असल्यास माहिती मिळवण्यासाठी प्रवासी आणि विद्यार्थी चौकशी कक्षाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करतात; मात्र तेथील स्थितीही गंभीर असल्याचे दिसून येते. चौकशी कक्षातील एक फोन बंद आहे, तर दुसऱ्या फोनवर कुणीही प्रतिसाद देत नसल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे. त्यामुळे प्रवाशांना कोणतीही अधिकृत माहिती मिळत नसून, संताप वाढत आहे.

बस उशिरा येणार असल्याची माहिती वेळेत मिळाल्यास विद्यार्थी ऑटो, खासगी वाहन किंवा इतर पर्यायांचा वापर करून परीक्षा किंवा क्लासेस गाठू शकतात; मात्र चौकशी कक्षाकडून सहकार्य न मिळाल्याने ही शक्यता कमी होत आहे. याबाबत तोंडी, तसेच लेखी तक्रारी करूनही प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप केला जात आहे. दरम्यान, नियोजनाअभावी बसस्थानकात विद्यार्थी आणि प्रवासी तासन्तास बसची प्रतीक्षा करत थांबलेले दिसत आहेत.

## बसस्थानकात सरकारी कर्मचाऱ्यावर हल्ला ; गुन्हा दाखल

प्रतिनिधी १४ एप्रिल

**देऊळगाव राजा :** शहरातील बसस्थानक परिसरात सरकारी कर्तव्य बजावत असलेल्या कर्मचाऱ्यावरच बेदम मारहाण करण्यात आल्याची गंभीर घटना समोर आली आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, प्रभाकर प्रल्हाद खरात (वय ५४, रा. बोराखेडी बावरा) यांनी दिलेल्या तक्रारीवरून अक्षय तोडे (रा. सिंदखेडराजा) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ११ एप्रिल रोजी सकाळी सुमारे ११:५० वाजता तसेच दुपारी २:५८ वाजता देऊळगाव राजा बसस्थानकात घडली. फिर्यादी खरात हे आपले सरकारी कर्तव्य बजावत असताना, आरोपी अक्षय तोडे हा त्याची प्रवासी वाहतूक करणारी टाटा मॅजिक गाडी बसस्थानकात घेऊन येऊन प्रवाशांना बेकायदेशीरपणे वाहनात बसवत होता. याबाबत खरात यांनी त्याला जाब विचारताच, आरोपी संतापला. आपल्या यानंतर आरोपीने थेट बसस्थानकातील चौकशी कक्षात घुसून फिर्यादीचा शर्ट ओढत त्यांना चापटा व बुक्क्यांनी मारहाण केली. एवढ्यावरच न थांबता, अत्यंत अश्लील शिवीगाळ करत 'रस्त्यावर सापडलास तर गाडीखाली घालून मारून टाकीन' अशी उघड धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे.

## तहसीलच्या महाराजस्व शिबिरात समाधान न झाल्याने वृध्द शेतकऱ्याचा मृत्यूपर्यंत उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी १४ एप्रिल

**चिखली :** संबंधित प्रशासनाकडे वेळोवेळी निवेदन देऊन सुद्धा न्याय न मिळाल्याने व २ वेळा समाधान शिबिरात निवेदन देऊनही समाधान न झाल्यामुळे किन्ही नाईक येथील ८० वर्षीय वृद्ध आदिवासी शेतकरी श्रीराम परसराम ढोके व पत्नी सौ. सिंधुताई ढोके यांनी चिखली तहसीलदार यांना निवेदन देऊन १५ एप्रिल पासून किन्ही नाईक येतील डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर आक्रोश बेमुदत आमरण उपोषण मृत्यूपर्यंत करणार चा इशारा दिला आहे.

या निवेदनात नमूद आहे की माझ्या ताब्यात सन १९८७ पासून किन्ही नाईकनाही येथील ई क्लास जमीन गट नंबर २२३ सर्वे नंबर ६३ मधील अंदाजे ४ ते ५ एकर शेत जमीन अतिक्रमण करून वहीती केली व कसत आहे आणि त्या जमिनीच्या कायमस्वरूपी पट्टा मिळण्यासाठी शासनाकडे अनेक वेळा कागदपत्राचा पाठपुरावा करून झालेला आहे यासाठी मी ३ वेळा आमरण उपोषण सुद्धा केले. तर राज्यात महसूल सेवा तुमच्या दारी या अनुषंगाने राज्यात राजे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे व महसूल सेवा घरपोच देण्यासाठीच्या

समाधान शिबिराचे आयोजन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत दिले. या शासकीय उपक्रमा अंतर्गत महसूल विभागाने समाधान शिबीरे आयोजित केली. माझे समाधान होण्यासाठी मी नियोजनबद्ध कार्यक्रमासाठी आपणाकडे व संबंधिताकडे सुद्धा आक्रोश विनंती निवेदन ६ मार्च रोजी दिले, २ महाराजस्व समाधान शिबिरात कार्यक्रम होऊनही माझे समाधान झाले नाही व न्याय नाही शेत जमिनीचा पट्टा नाही सदर निवेदन जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी यांना सुद्धा माहीतीस्तव दिले अमडापुर येथील बल्लाळ देवी मंदिर परिसरात शासकीय योजनांचा महामेळावा झाला त्यातही सदर निवेदन दिले. तर १४ मार्च रोजी उदयनगर येथील चिखली तहसीलच्या समाधान शिबिरात सुद्धा आक्रोश निवेदन दिले नियोजन मंडळाने माझे निवेदन निर्णयासाठी ठेवायला पाहिजे होते. परंतु मला वंचित व अन्याय पीडित करून ठेवले वेळेवर उद्भवल्या समस्येचे निराकरण करण्यासाठी व सर्व सेवा एकाच ठिकाणी एकाच दिवशी शासनाच्या या उपक्रमांतर्गत लाभ देण्यासाठी निर्णय आहे. परंतु माझ्या निवेदनाचा विचार न झाल्यामुळे मला वंचित ठेवले असे निवेदनात नमूद आहे.

## थोडक्यात

### येरळीजवळ अनोळखी इसमाचा मृतदेह आढळला!

**खामगाव :** नांदुरा तालुक्यातील येरळी शिवारात सोमवारी एका अनोळखी प्रौढाचा मृतदेह आढळला. या प्रकरणी नांदुरा पोलिस आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, येरळी येथील पोलिसपाटील सुनील डिगांबर पाटील(५१) यांना गावातील बकऱ्या चारणारे हर्षल सहदेव चंदनशिव यांनी फोनद्वारे माहिती दिली. ग्राम येरळी शिवारातील सरकारी पडीत जागेत, रस्त्याच्या कडेला बाभळीच्या झाडाखाली एक अनोळखीपुरुष मृत अवस्थेत पडलेला असल्याचे त्यांनी कळविले. मृत व्यक्ती अंदाजे ५० ते ५२ वयोगटातील असून, तो झोपलेल्या अवस्थेत आढळून आला. त्याच्या अंगावर निळसर रंगाची लुंगी होती, तर शेजारी फिकट पोपटी रंगाचे बनियन व भुरकट रंगाचा शर्ट आढळून आला. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला.

### निळेगाव येथे कौटुंबिक वादातून दगडफेक; दोघे जखमी

**खामगाव :** तालुक्यातील निळेगाव येथे कौटुंबिक कार्यक्रमांसाठी निमंत्रण देताना झालेल्या वादातून दगडफेक होऊन दोघे जखमी झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संजय जंगलुमन हिवराळे (४९, रा. निळेगाव, ता. खामगाव) यांच्या फिर्यादीनुसार, ते त्यांच्या चुलत भावाच्या मुलाच्या साखरपुडा कार्यक्रमासाठी गावात निमंत्रण देत होते. दरम्यान, १२ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास निळेगाव येथे आरोपी राजू विनायक भोजने (रा. निळेगाव) याने फिर्यादीस उद्देशून शिवीगाळ करत, वाद घातला. वाद चिघळल्यानंतर आरोपीने दगडफेक केली. यात फिर्यादी संजय हिवराळे यांच्या डोक्याला मार लागून ते जखमी झाले. भांडणाचा आवाज ऐकून त्यांची आई जिजाबाई हिवराळे या मध्यस्थी करण्यासाठी आल्या असता, आरोपीने त्यांच्यावरही दगड फेकून मारहाण केली, ज्यामुळे त्यादेखील जखमी झाल्या.

### शांतता समितीची बैठक उत्साहात

**जळगाव जामोद :** स्थानिक पोलिस व स्टेशनमध्ये आगामी सण महापुरुषांच्या जयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीची बैठक सोमवार, दि. १३ एप्रिल रोजी उत्साहात पार पडली. बैठकीत महापुरुष सर्व समाजाचे असल्याचे सांगत एकत्रितपणे उत्सव साजरे करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले. डीजेवरील खर्च टाळून तो निधी समाजोपयोगी कामांसाठी वापरण्याचा सल्ला देण्यात आला. षजिल्हा पोलिस अधीक्षक नीलेश तांबे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सामाजिक सलोखा व विधायक उत्सवांवर भर देण्यात आला. अपर पोलिस अधीक्षक श्रेणिक लोढा, नायब तहसीलदार भरत किटे, गटशिक्षणाधिकारी श्रीकांत जोशी यांची उपस्थिती होती.

## क्रांतिवीर ज्योतिबा फुले यांना जयंतीनिमित्त अभिवादन

प्रतिनिधी १४ एप्रिल

**खामगाव :** मलकापूर भीमनगर येथील त्रिरत्न बुध्द विहाराच्या सभागृहात क्रांतिवीर महात्मा ज्योतिबा फुले यांच्या दिशताब्दी जयंतीनिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात व : प्रेरणादायी वातावरणात पार पडला. समाजभूषण डॉ. जी.ओ. जाधव यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाला मलकापूर नगरपरिषदेचे शिक्षण सभापती तथा समतेचे निळे वादळ संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भाई अशांत वानखेडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. आपल्या मनोगतात भाई अशांत वानखेडे यांनी महात्मा फुले यांच्या जीवन कार्यावर सखोल प्रकाश टाकतांना सांगितले की, महात्मा ज्योतिबा फुले यांनी समाजातील शोषित, वंचित व दुर्बल घटकांसाठी केलेले कार्य हे मानवतेच्या कल्याणाचे जिवंत दिग्दर्शन आहे.

शिक्षण, समानता व सामाजिक न्याय या मूल्यांची रुजवात त्यांनी आपल्या कार्यातून केली असून आजच्या पिढीने त्यांचा आदर्श घेतला पाहिजे. कार्यक्रमात विविध वत्तत्यांनी ही महात्मा फुले यांच्या विचारांची व कार्याची उजळणी करत त्यांच्या सामाजिक क्रांतीचे महत्त्व अधोरेखित केले. उपस्थितांनी फुले यांच्या विचारांचा अंगीकार करून समाजात समता आणि बंधुता निर्माण करण्याचा संकल्प व्यक्त केला. या कार्यक्रमाचे आयोजन जयंती समिती अध्यक्ष ॲड. कुणालभाई वानखेडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. कार्यक्रमास समतेचे निळे वादळ संघटनेचे शहराध्यक्ष मोहन खराटे, दिलीप इंगळे, सतीश नाईक, राहुल क्षीरसागर, प्रशांत बगाडे, भारत महाले यांच्यासह अनेक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिला-पुरुषांचा उत्स्फूर्त सहभाग या कार्यक्रमाला लाभला.

## थंड असणारा बुलढाणा जिल्हाही तापला

**बुलढाणा :** राज्यात बुलढाणा जिल्हा थंड हवेचा म्हणून ओळखला जातो. मात्र सोमवारी बुलढाणा जिल्ह्याचे तापमान ४० अंशावर पोहोचल्याने बुलढाणेकरांना तापमानाने बेजार करून सोडले. बुलढाणा शहराच्या तारही बाजुंनी धनदाट जंगल असल्यामुळे तसेच उंच्च ठिकाणी हे शहर बसल्याने येथे तापमानाचा पारा विदर्भात सर्वात कमी राहतो. मात्र, दोन-तीन दिवसांपासून बुलढाण्याच्या तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येत आहे.


## होमगार्ड जवानाचा अपघाती मृत्यू

**चिखली :** पथकातील होमगार्ड जवान आत्माराम उत्तमराव वखरे वय ५७, रा. सवनायांचा कर्तव्यावर असतानाच झालेल्या भीषण अपघातात मृत्यू झाल्याची घटना घडली. या घटनेमुळे चिखली परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार , आत्माराम वखरे हे दुपारी सुमारे साडेबारा वाजण्याच्या सुमारास कार्यालयीन ड्युटीवर होते. कामकाज आटोपून ते बुलढाणा जिल्हा पोलीस कार्यालयात डाक देण्यासाठी दुचाकी (एम.एच. २८ जे.बी. १४७१ ने जात होते. त्यांच्या सोबत किरण तुकाराम मोरे (वय ५०) हेही दुचाकीवर होते. दरम्यान, केळवद येथील हॉटेल गुलमोहरसमोर त्यांच्या दुचाकीला बोलेरो पिकअप (एम.एच. २८बी. बी. ७३६०) या वाहनाने जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात आत्माराम वखरे यांचा जागीच मृत्यू झाला, तर किरण मोरे हे किरकोळ जखमी झाले आहेत. घटनेची माहिती मिळताच अप्पर पोलीस अधीक्षक तथा जिल्हा समादेशक अमोल गायकवाड, चिखली पोलीस स्टेशनचे ठाणेदार भूषण गावंडे तसेच तालुका होमगार्ड समादेशक शिवसिंग साळोख यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली व परिस्थितीचा आढावा घेतला.

सिटी न्यूज सुपरफास्ट

संमिश्र

## व्यंकटेश बालाजी स्कूलमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



प्रतिनिधी १४ एप्रिल

**मूर्तिजापूर :** व्यंकटेश बालाजी इंग्लिश स्कूलमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेच्या मुख्याध्यापिका सारिका कडू व पर्यवेक्षिका वंदना भाकरे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले.

समता बंधुता आणि न्यायाचा मार्ग दाखविणाऱ्या महा सूर्याला विनम्र अभिवादन करून, ज्यांच्यामुळे आज आपण ताठ मानेने जगत आहोत त्या जगातील सर्वात विद्वान व्यक्तीला, महामानवाला कोटी कोटी प्रणाम करून, भीम जयंतीच्या शुभेच्छा शाळेच्या मुख्याध्यापिका कडू यांनी सर्व उपस्थितांना दिल्यात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारसरणीचे आचरण आपल्या जीवनात करावे असे मार्गदर्शन त्यांनी केले.

वर्ग सातवी ची विद्यार्थिनी निधी लाखे व सोहम शिंदे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## वनपट्टाधारक फार्मर शेतकऱ्यांसाठी आयडी नोंदणी मोहीम सुरू

**अकोला :** कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी नोंदणी अनिवार्य करण्यात आलेला आहे. वनहक्क अधिनियम, २००६ अंतर्गत अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी समुदायांना त्यांच्या वनजमिनीवरील हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत. त्या अनुषंगाने राज्यातील वनपट्टा धारक शेतकऱ्यांची फार्मर आयडी नोंदणी करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. वनपट्टा धारक शेतकऱ्यांनी आपल्या जवळील नागरी सुविधा केंद्र येथे भेट देऊन आवश्यक कागदपत्रांसह शेतकरी आयडी नोंदणी करून घ्यावी. शेतकरी नोंदणी झाल्यानंतर संबंधित शेतकऱ्यांना कृषि विभागाच्या विविध योजना, अनुदान, पीकविमा, नैसर्गिक आपत्ती सहाय्य तसेच इतर डिजिटल कृषी सेवांचा लाभ सुलभपणे मिळण्यास मदत होणार आहे.

## अकोटमध्ये 'जय ज्योती जय क्रांतीच्या जयघोषात थिरकले फुले प्रेमी

प्रतिनिधी १४ एप्रिल

**अकोट :** अकोट शहरांमधील संत शिरोमणी सावता माळी स्मारक फुले चौक सोमवार वेस आकोट येथील क्रांतीसुर्य ज्योतिराव फुले उत्सव समितीच्या पुढाकाराने ११ एप्रिलला क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्ताने संत शिरोमणी स्मारक येथील संत सावता व ज्योतिराव फुले, आई सावित्रीबाई फुले यांच्या फोटो प्रतिमेचे पूजन करून हार अर्पण समाज बांधवांनी पुष्पहार वाहिले.



सायंकाळी नंदिकेश्वर मंदिर प्रणांगणातून सजवलेल्या रथावर ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमा पुतळ्याला विराजमान करून शहर ठाणेदार अमोल माळवे यांच्या प्रमुख उपस्थितीत 'जय ज्योती जय क्रांतीच्या' जयगोषामध्ये , 'एक था माळी लाखाला भारी' या बहारदार गीतावर मिरवणूक काढली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विहारांमध्ये पूजन व पुष्पहार वाहिले, मिरवणुकीमध्ये विशेष आकर्षण नंदकिशोर महिला व्यायाम शाळा चिमुकल्या विद्यार्थिनींचे चित्त थरारक आखाडे लाठी काठी, तलवारबाजी, अग्नीच्या गोळ्यांचे पथनाट्य, वेशभूषा विविध प्रकारच्या आखाड्याचे सादरीकरण करून फटाक्यांची विशेष आकर्षण आकाश बाजी संपूर्ण अकोट शहरवासी यांचे लक्ष आकर्षण ठरले.

गवळीपुरा येथे नगरसेवक अमोल पालेकर , नगरसेवक जितेश बरेठिया, नगरसेवक चेतन मर्दाने, सह राजेश नागमते यांनी उत्सव समिती पदाधिकाऱ्यांची फुल पुष्प शाल सत्कार करण्यात आले व सर्वांना पाणी लिंबू शरबत वाटप करण्यात आले, शेठ सोनू चौक येथे सक्षम सामाजिक संघटना अनिकेत पोतले, बजरंग मिसळे, शुभम गावंडे, पवन माकोडे यांनी पूजन फुल पुष्प वाहून आयोजक मंडळींचा स्वागत सत्कार केला, जयस्तंभ चौक येथे स्मित पवार, फुले आंबेडकर नगर मध्ये सर्व नगरवासीयांनी पाणी लिंबू सरबत सर्वांचे वाटप करून स्वागत केले.

मयूर निमकर, महेश खलोकार, अजय काळे, हर्षल खासबागे, सुहास पवार, मोहित शेंडे, शुभम बोरोडे, सुमित येवतकर, प्रणय शेगोकार, सचिन काळे, शुभम शेगोकार, रोशन काळे, मोहित दिंडोकार, गणेश बोरोडे, आशिष बेलोकार, ॲड प्रशिश उपाशे, नंदकिशोर शेगोकार, आचल बेलसरे नगरसेवक, सचिन जुनगरे नगरसेवक, प्रथमेश बोरोडे उपनगराध्यक्ष, शिवम बोरोडे आरंभ इव्हेंट डेकोरेशन यांचे विशेष सहकार्य लाभले, क्रांतीसुर्य उत्सव समितीचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
मंगळवार, दि. १४ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com




# महामानवाला अभिवादन करण्यासाठी लोटला जनसागर

प्रतिनिधी १४ एप्रिल

**अकोला :** अकोला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त अकोला शहरासह जिल्ह्यात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. अशोक वाटिका तसेच शहराच्या विविध भागात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना मानवंदना देण्यात आली. अतिशय उत्साही वातावरण होते. युवकांनी रॅली काढून जल्लोष केला. जय भीम चा जयघोष ठिकठिकाणी करण्यात आला.

सोमवारी रात्री पासूनच शहरात जयंती सोहळ्याची तयारी सुरु होती.






















हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012 /49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK